ગુજરાત શૈક્ષણિક સંશોધન અને તાલીમ પરિષદ, ગાંધીનગરના પત્ર–ક્રમાંક
જીસીઈઆરટી/અભ્યાસક્રમ/માધ્યમ/૨૦૧૫/૬૪૧, તા. ૯-૧-૨૦૧૫–થી મંજૂર

# मराठी

## इयत्ता ४

### ( प्रथम सत्र - द्वितीय सत्र )

**प्रतिज्ञापत्र**

भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बंधुभगिनी आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.
त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी
सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन
आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करतो
त्यांचे कल्याण आणि त्याची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावलेले आहे.

**રાજ્ય સરકારની વિનામૂલ્યે યોજના હેઠળનું પુસ્તક**

विद्यार्थ्याचे नाव : ____________________

शाळेचे नाव : ____________________

इयत्ता : __________ रोल नंबर : __________

गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ
'विद्यायन', सेक्टर १०-ए, गांधीनगर-३८२०१०

© गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, गांधीनगर
या पाठ्यपुस्तकाचे सर्व हक्क गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्वाधीन आहेत. या पाठ्यापुस्तकातील कोणताही भाग, कोणत्याही स्वरूपात गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या नियामकांच्या लेखी परवानगी शिवाय प्रकाशित करता येणार नाही.

**विषय-सल्लागार**
डॉ. सुषमा करोगल

**कन्वीनर**
श्री एस. व्हाय. मांडलिक

**लेखन-संपादन**
श्रीमती मिनाक्षी जोशी
श्रीमती वृंदा बाम
श्री नुरूद्दिन शाह

**समीक्षा**
श्री पी. एम. पाटील
श्रीमती सुनंदा चौहाण

**चित्रांकन**
राजेश बारैया

**संयोजन**
डॉ. कमलेश एन. परमार
(विषय-संयोजक : हिन्दी)

**निर्माण-आयोजन**
श्री हरेन शाह
(नायब नियामक : शैक्षणिक)

**मुद्रण-आयोजन**
श्री हरेश एस. लीम्बाचीया
(नायब नियामक : उत्पादन)

## प्रस्तावना

जी.सी.ई.आर.टी. च्या स्टेट रिसोर्स ग्रुप (SRG) द्वारा NCF-2005 आणि RTE-2009 च्या दस्तावेजांना केन्द्रस्थानी ठेवून सन् 2011 मध्ये प्राथमिक शिक्षणात इयत्ता १ ली ते ५वी ची मराठी पुस्तके भाषेत नवीन अभ्यासक्रमात निर्देश केलेल्या मुद्यांच्या आधारावर तयार केलेली आहेत. इयत्ता ४री मराठीचे हे पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांसमोर ठेवतांना मंडळास आनंद होत आहे.

राष्ट्रीय स्तरावर अभ्यासक्रमात होणारे परिवर्तन लक्षात ठेवून गुजरात राज्यात प्राथमिक स्तरावर अभ्यासक्रम (Curriculam), पाठ्यक्रम (Syllabus), पाठ्यपुस्तके (Textbooks) तसेच शिक्षण प्रक्रियेस नव्या दृष्टिकोणातून, रुप देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनात्मकता, विचारशक्ती, तर्कशक्ती तसेच प्राप्त ज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता वाढवावी. ह्या उद्देशांना महत्त्व देण्यात आले आहे. पाठ्यपुस्तकात दिलेल्या प्रवृत्यांच्या आधारे विद्यार्थ्यांचे चर्चा, चिंतन आणि पृथ्थकरण करुन बौद्धीक स्तर वाढेल. समूहकार्यासाठी व्यक्तिगत विकास करतील असा प्रयत्न आहे. तरी पण नवीन पाठ्यक्रमाच्या आधारे तयार केलेले हे पुस्तक ध्येय नसून मात्र दिशासूचक साधन आहे.

पाठ्यपुस्तकां शिवाय विशेष माहितीसाठी आधुनिक उपकरण उपलब्ध आहेत. म्हणून शिक्षणात अभिवृद्धी झाली आहे. हे लक्षात ठेवून अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिये द्वारा विद्यार्थ्यांना उत्तम नागरिक होण्याची प्रेरणा मिळेल, राष्ट्रप्रेम वाढेल आणि ते योग्य चारित्र्यसंपन्न बनतील असा प्रयत्न आहे. पाठ्यपुस्तकांच्या उपयोगाद्वारे ह्या प्रक्रियेला सरळ आणि रुचिपूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

ह्या पाठ्यपुस्तकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध करण्यापूर्वी त्याच्या हस्तप्रतीच्या स्तरावर शिक्षणकार्य करणाऱ्या शिक्षक आणि तज्ज्ञांद्वारे सर्वांगीण समीक्षा करण्यात आली आहे. शिक्षक तसेच तज्ज्ञांच्या सुचनेप्रमाणे हस्तप्रतीत योग्य सुधारणा केल्यानंतर हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

ह्या पाठ्यपुस्तकांची गुणवत्ता अभिवृद्धीसाठी आपण विद्वान व्यक्ती, शिक्षक, पालक आणि वाचकांच्या सूचनांचे आम्हाला महत्त्व असल्याने पाठ्यपुस्तक मंडळ आपल्या सुचनांचे स्वागत करेल.

**पी. भारती**(IAS)
नियामक
ता. 21-11-2019

कार्यवाह प्रमुख
गांधीनगर

**प्रथम आवृत्ती :** 2015 **पुनःमुद्रण :** 2016, 2017, 2018, 2019, 2020
**प्रकाशक :** गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, 'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगर साठी पी. भारती, नियामक.
**मुद्रक :**

# मूलभूत कर्तव्ये

भारतातील प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :*

(क) घटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्थाचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

(ख) ज्यामुळे आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करुन त्यांचे अनुकरण करणे;

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व संरक्षण करणे;

(घ) आवाहन केले जाईल तेंव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे;

(च) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे;

(छ) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे;

(ज) अरण्ये, सरोवरे, नद्या व जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावराचे रक्षण करणे, त्यात सुधारा करणे, आणि सजीव प्राण्यांविषयी दयाबुद्धी बाळगणे;

(झ) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण, मानवतावाद आणि शोधक बुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे;

(ङ) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे वन्य हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे;

(ट) राष्ट्र सतत पुरुषार्थ व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे, हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे;

(ठ) आई-वडील किंवा पालकांनी 6 वर्ष ते 14 वर्षापर्यंत वयाच्या स्वत:च्या मुलांना किंवा पाल्यांना शिक्षणाची संधी देणे.

*भारताची घटना : कलम 51-क

# अनुक्रमणिका


| प्रथम सत्र | | | |
|---|---|---|---|
| क्रम | पाठाचे नाव | लेखक/ कवि | पान नं |
| १. | टोपीवाला आणि माकडे | - | १ |
| २. | भाजी घ्या भाजीऽ भाजीऽ | मंगेश पाडगावकर | ३ |
| ३. | माणुसकीची ज्योत | आनंदीबाई शिर्के | ७ |
| ४. | सशाचे रक्षण कसे झाले ? | - | ११ |
| | पुनरावर्तन — १ | - | १३ |
| ५. | कोडे | - | १४ |
| ६. | गवतफुला रे गवतफुला | इंदिरा संत | १६ |
| ७. | प्रेमाचा महिमा | - | १९ |
| | पुनरावर्तन — २ | - | २१ |
| **द्वितीय सत्र** | | | |
| ८. | पत्रलेखनाची मजा | - | २३ |
| ९. | मोर अंगणी नाचतो | - | २६ |
| १०. | मूर्खांची यादी | - | २९ |
| ११. | मौलाना अबुल कलाम आझाद | - | ३३ |
| | पुनरावर्तन — ३ | - | ३६ |
| १२. | संत बसवेश्वर आणि चोर | अशोक मेनकुदळे | ३९ |
| १३. | पाखरांशी मैत्री | भा. दो. पाटील | ४४ |
| १४. | भारतमाता | शांता शेळके | ४९ |
| १५. | सत्याची ताकद | सुधा मूर्ति | ५२ |
| | पुनरावर्तन — ४ | - | ५६ |
| **पूरक वाचन** | | | |
| १. | झाड | ल. म. कडू | ५८ |
| २. | जिद्द हीच दौलत | दिनकर देशपांडे | ५९ |
| ३. | रमाबाई आंबेडकर | कृ.प.देशपांडे, सौ. सुभदा देशपांडे | ६२ |
| ४. | होय मी सुद्धा | राजीव तांबे | ६५ |

# १. टोपीवाला आणि माकडे


एक होता सखाराम टोपीवाला.
तो गावोगाव टोप्या विकायला जात असे.





एकदा तो टोप्या विकायला निघाला .
वाटेत जंगल लागले .
चालून चालून सखाराम दमला.

त्या झाडावर दोन माकडे होती.
एका माकडाने खाली उडी मारली.
त्याने पेटी उघडली.





दुसरे माकडे खाली आले
आणि त्यानेही तसेच केले.

मग सर्व माकडे त्या झाडावर चढली
आणि 'हूप् हूप् हूप् हूप् ' असे ओरडू लागली.
बघतो तर पेटीत टोप्या नाहीत त्याने वर पाहिले.





सखारामने आपली काठी माकडांवर उगारली
माकडांनी लहान लहान फांदया तोडल्या



त्याने आपल्या डोक्यावरची
टोपी काढून पेटीत फेकली

## स्वाध्याय

### १. खाली दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :

१. टोपीवाल्याचे नाव काय होते ?

२. तो काय विकत होता ?

३. माकडांनी टोपी कोठे ठेवली होती ?

४. सखारामने माकडांवर – काय उगारले होते ?

५. माकडांचे वागणे बघून सखारामच्या लक्षात काय आले ?

### २. खाली दिलेल्या उदाहरणा प्रमाणे शब्दांचा वाक्यात उपयोग करा :

१. वाघ – वाघ डरकाळी फोडतो

२. गाय –

३. घोडा –

४. कुत्रा –

५. मांजर –

६. गाढव –

### ३. तुम्ही बागेत फिरायला जाता तेव्हा तेथे तुम्हाला काय काय दिसते त्याचे वर्णन करा :

...........................................................................................................

...........................................................................................................

### ४. कंसात दिलेल्या शब्दांच्या आधारे रिकाम्या जागा भरा :

१. वाघ --- राहतो.

२. उंदीर --- राहतो.

३. पक्षी --- राहतात.

४. साप --- राहतो.

५. माणूस --- राहतो.

६. गाय --- राहते.

### ५. खाली दिलेल्या वाक्यासमोर कंसातील योग्य शब्द लिहा :

**( पक्षी, ऋतु, पालेभाज्या, फळे, रंग, महिने )**

१. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च ----

२. आंबा, पेरू, सिताफळ ----

३. लाल, हिरवा, पिवळा ----

४. हिवाळा, पावसाळा, उन्हाळा ----

५. मेथी, पालक , शेपू ----

६. मोर, पोपट, चिमणी ----

### ६. सूचनेप्रमाणे लिहा :

१. 'क' अक्षरापासून सुरू होणाऱ्या घरातील पाच वस्तूची नावे लिहा :

२. वर सांगितलेल्या प्रत्येक वस्तूचा एक उपयोग लिहा :

#### प्रवृत्ती :

- प्राण्यांची चित्र एकत्रित करून त्यांचे पाळीव प्राणी व जंगली प्राणी.
- असे वर्गीकरण करा व तक्ता तयार करा.
- चित्रगोष्टी मिळवा व वाचा.
- 'प्राण्यांची सभा' ही कविता मिळवा व ती पाठ करा.

# २. भाजी घ्या भाजीऽ... भाजीऽ....

– मंगेश पाडगावकर

उगीच् रडत्
बस्ते भेंडी,
म्हणते हवी
लांब् शेंडी !

भोपळशेठ्चा
घेर मोठा,
कळतो फक्त
फायदा–तोटा !

पड्वळ म्हणतो
मारीत थाप्,
"गेल्या जन्मी
होतो–साप् !"

पालक म्हणतो
हिर्वा गार,
"माझी पोरे
हुषार फार !"

टॉमॅटोचे
लाल् गाल्,
जवळ् जाऊन,
पापाच् घ्याल् !

गोरा गोरा
अग्दीच् खुळा,
वाट् बघत्
बस्ला मुळा ।



ग्यानबाचे,
तुक्याचे,
कणीसआहे
मक्याचे !

अंग जरासे
जाड जहाले,
उपास करिते
म्हणुन रताळे !

लिंबू म्हणते
करित उताविळ,
"कालच झाली
मजला काविळ !"

गरिब बिचारी
मिरची म्हणते,
"सांगा, मी कधि
तिखट बोलते ?

आले आले
म्हणुन म्हणाले,
तरीहि नाही
कोणी आले !

गाजर आले
नेसुन लुंगी
आणि वाजवी
मजेत पुंगी !

गोड बोलुनी
मला भारले,
जवळ बोलवी
कडू कारले !

अंगाची जरि
नुसती काडी,
कोथिंबिरिला
हिरवी साडी !

सगळ्या भाज्यांचा
जम्वून् अड्डा,
अध्यक्ष झाला
कोबीचा गड्डा !

## शब्दार्थ

**उगीच** विना कारण **मजला** मला
**घेर** आकार **पुंगी** तोंडाने वाजविण्याचे एक साधन
**भारले** लक्ष वेधून घेणे

## टीप

**ग्यानबा** ज्ञानेश्वर, महाराष्ट्रतील एक महान संत, बोली भाषेत त्यांचा उल्लेख ग्यानबा असे करतात.
**कावीळ** एक प्रकारचा आजार, त्यात डोळे पिवळे होतात.

### १. खाल प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :

१. भेंडी का रडत आहे ?
२. पड्वळ काय म्हणतो ?
३. टॉमॅटो ला पाहुन कसे वाटते ?
४. मिरची काय म्हणते आहे ?
५. सगळया भाज्यांचा अध्यक्ष कोण आहे ?

### २. खाल प्रत्येक शब्दाचा वापर करून दोन वाक्ये लिहा :

भेंडी –

(१) भेंडी हिरवी असते.
(२) भेंडीची भाजी मुलानां आवडते.
(१) पालक (२) मुळा (३) कणीस (४) कारले (५) रताळे

### ३. खाल दिलेल्या दोन शब्दावरून एक वाक्य बनवा :

उदाहरण : भोपळा– मोठा

भोपळ्याचा आकार मोठा असतो.

(१) खुळा – मुळा (२) कोथिंबिर – हिरवी (३) गाजर – पुंगी

(१) ----------------------------------------

(२) ----------------------------------------

(३) ----------------------------------------

४. बॉक्स मध्ये दिलेल्या ट्राफिक संकेतासमोर योग्य साइन बोर्ड लिहा आणि ही चिह्ने काय सुचवितात त्याची चर्चा करून लिहा :


(नो पार्किंग, रेल्वे गेट, नो हॉर्न, स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसिंग, नो एन्ट्री)



(१)------------------ (२) --------------------



(१)------------------ (२) --------------------



(१)------------------ (२) --------------------




(१)------------------ (२) --------------------



(१)------------------ (२) --------------------



(१)------------------ (२) --------------------

५. खाली दिलेल्या कवितेच्या ओळी स्वच्छ आणि सुंदर अक्षरात लिहा :

१. भोपळ शेठ्चा घेर मोठा, कळतो फक्त फायदा तोटा न !

२. पालक म्हणतो हिर्‌वा गार, ''माझी पोर हुषार फार !''

३. गरिब बिचारी मिरची म्हणते, ''सांगा, मी कधी तिखट बोलते !''

४. लिंबू म्हणते करित उताविळ, ''कालच झाली मजला काविल !''

६. खालील काव्यपंक्ति पूर्ण करा :

पड्वळ म्हणतो..........

..............हुषार फार !

७. खाली दिलेल्या उदाहरणा प्रमाणे कवितेमधून प्रासवाले शब्दांच्या जोड्या बनवा :

उदाहरण : भेंडी – शेंडी,

८. कवितेतील खालील ओळी वाचा :

कडू कडू कारले

त्याने सर्व रोगानां मारले

तुम्ही पण कवितेच्या अशा ओळी तयार करा आणि लिहा. (कोणत्याही दोन)

---------------------

---------------------

९. खालील शब्द शब्दकोशच्या क्रमांने लावा :

(भेंडी, मूळा, पालक, मिरची, लिंबू)

(१) (२) (३) (४) (५)

**प्रवत्तीृ**

- अभिनय करता येईल अशा बालगीतांचा संग्रह तयार करा.
- बड्‌बड्‌गीतांचा अंक बनवा.

# ३. माणुसकीची ज्योत - आनंदीबाई शिर्के

'महाराज' या नावाने ओळखले जाणारे एक थोर पुरुष गुजरातेत आहेत. त्यांचे नाव रविशंकर शिवराम व्यास. गुजरातेत त्यांचे नाव सर्वांना माहीत आहे. सारे त्यानां मानतात.

गुजरातेत पाटणवाडिये या नावाची एक जमात आहे. चोऱ्यामाऱ्या करणे, दरोडे घालणे हाच या जमातीचा पूर्वी धंदा होता. चोऱ्या कराव्यात, तरुंगात जावे, सूटून आल्यावर पुन्हा तेच करावे असे त्यांचे आयुष्य होऊन बसले होते.

सरकारने यावर हजेरीचा तोडगा काढला. स्त्रिया, मुले व पुरूष या सर्वांना रोज पोलिस चौकीवर जाऊन हजेरी द्यावी लागत असे. आपण चोऱ्या केल्या नाहीत, घरातच होतो, हे हजेरी देऊन त्यांना पटवून दयावे लागे. हजेरी देण्यासाठी स्त्रियांनाही पोलीस चौकीवर जावे लागत असे म्हणून पुरूषांना चीड येई. महाराजांना हे कळले, तेव्हा त्यांना फार वाईट वाटले. स्त्रियांना असे वागवणे महाराजांना खपले नाही. ते त्यांची हजेरी रद्द करण्याच्या प्रयत्नाला लागले.

संध्याकाळच्या वेळी वडोदराहून महाराज झपाट्याने चालले होते. मध्येच कोणीतरी म्हणाले, ''महाराज, अशा तिन्हीसांजेच्या वेळी कुंठ निघालात, एवढी घाई कसली ?

''मी जरा बडोद्याला चाललो आहे.''

''आत्ता या वेळी बडोद्याला ? आणि तेही चालत ! अहो, पंचवीस कोसांची मजल आहे !''

''पण काय करणार ?'' मला गेलंच पाहिजे. या लोकांची हजेरी रद्द करायची आहे ना ? त्याबद्दलचे कागदपत्र मला आताच मिळाले, म्हणून उद्या लवकरात लवकर मला बडोद्याला पोचलं पाहिजे.'' एवढे बोलून महाराज झपाट्यने चालू लागले.

सारी रात्र चालून चालून महाराज बडोद्याला पोचले. तेथील अधिकाऱ्यांना भेटले, हजेरी रद्द करण्याचा हुकूम मिळवला आणि ते लगेच परत फिरले.

वाटेतच मध्यरात्र झाली. दिवस थंडीचे होते. त्यांच्या मनात विचार आला, 'आता कडाक्यांची थंडी पडली आहे. असे थंडीत चालत राहण्या ऐवजी येथेच कोठे तरी रात्र काढावी. सकाळ झाल्यावर उठून लगेच गावी जाऊ.' असा विचार करीत ते निघाले. किनखेळ नावाच्या एका गावाजवळ आले.

मध्यरात्रीची वेळा त्या खेडेगावात या वेळी कोण जागे असणार ? आणि झोपलेल्यांना उठवायचे तरी कसे ? महाराज तसेच आपल्या ओळखीच्या घरा जवळ गेले, पण त्यांनी कोणाला उठवले नाही. समोर गवताची एक गंज होती. तेथून थोडे गवत त्यांनी काढून घेतले. तेच अंथरूण म्हणून अंगणात टाकले आणि गवताच्या बिछान्यावरच त्यांनी अंग टाकले. थकलेला जीव, लगेच त्यांना झोप लागली. पहाट होताच ते उठले आणि झपाट्याने पुढे चालू लागले.

त्यांच्या प्रयत्नाने पाटणवाडिये जमातीची हजेरी रद्द झाली. मग त्यांनी साऱ्यांना बोलावून म्हटले, पाहा रे बाबांनो तुमची हजेरी आता रद्द झाली. आता चांगलं वागा. वाईट वागलात तर माझ्यावर ठपका येईल.

महाराजांवर या लोकांचे फार प्रेम होते. परंतु हाडीमासी खिळलेली त्यांची चोरीची सवय मधूनच डोके वर काढी. गुन्हा घडे. महाराज मग सर्वांना एकत्र जमवून म्हणत. "कोणी चोरी केली हे कबूल करा आणि शिक्षा भोगायला तयार व्हा, नाही तर भी उपास करीन."

कधी कधी त्यांची ही मात्रा लागू पडत नसे. मग महाराजांना उपास करावा लागे. एकएक दोनदोन दिवसच नाही तर कधी कधी आठआठ दहादहा दिवससुद्धा उपास करावा लागे. मग मात्र चोरी करणारा अपराधी येऊन महाराजांचे पाय धरी, गुन्हा कबूल करी आणि महाराजांना उपास सोडण्यास सांगे. महाराजांना आनंद होई. ते त्याला चौकीवर नेत. गुन्हा केल्या बद्दलची त्याची शिक्षा सौम्य करण्याची खटपट करीत; पण गुन्हा केल्यास शिक्षा भोगली पाहिजे हे त्याला पटवीत.

रिकामपण हे गुन्ह्याचे मूळ आहे, ही गोष्ट सर्वांना महाराजांनी पटवून दिली. मोठा प्रयत्नाकरून या जमातीला त्यांनी जमिनी मिळवून दिल्या. बी-बियाणे देऊन शेती करायला लावले. दुष्काळात कामे मिळवून दिली. त्यांना लिहा – वाचायला शिकवले. साथीच्या रोगात रोग्यांची सेवाचाकरी केली. हाक आली तेथे तेथे ते धावून गेले.

लोकांची सेवा करण्यात ते आयुष्याचा क्षण न् क्षण वेचतात.

एकदा एका मुलाला कुत्रे चावले. जखम खूपच चिघळली. मुलाची तडफड त्यांना पाहावेना. त्याची काळजी कोणी घेतली नाही. दुखणे जिवावार बेतले. महाराजांना ते कळले मात्र, त्यांनी मुलाला आणि त्याच्या वडिलांना दवाखान्यात नेले. मुलाला तपासून डॉक्टर म्हणाले, "मुलाला काही दिवस इथंच ठेवलं पाहिजे", महाराजांना प्रश्न पडला – मुलाजवळ कोण राहाणार ? ते त्याच्या वडिलांना म्हणाले, "तू राहा बाबा मुलाजवळ."

पण मुलाचा बाप म्हणाला, "नाही बाबूजी, मी कसा राहू ? माझ्या शेताची सगळी कामं तुंबली आहेत. इथं बसून राहू आणि वर्षभर काय खाऊ ?"

यावर महाराज काय बोलणार ? महाराजांनी त्याची अडचण ओळखली आणि त्या मुलाची सेवा करण्यासाठी ते स्वत: त्या मुलाजवळ राहिले.

### शब्दार्थ

**थोर** महान, **जमात** एखादा विशिष्ट समूह (जात) **दरोडे** धन धान्य लुटण्यासाठी धाड घालणे, **तुरुंग** कारागृह, **तोडगा** उपाय, **खपणे** पटणे, **झपाट्याने** जोराने, **तिन्हीसांजा** संध्याकाळ, **मजल** विशिष्ट अंतराचा टप्पा, **हुकूम** आदेश, **सौम्य** कमी, **गंज** ढीग, **ठपका** – आरोप, **अपरात्री** खूपरात्री, **तुंबणे** थांबून राहणे, **कबूल** मंजूर, **हाडीमासी खिळणे** एखादी सवय कायमची लागणे, **गुन्हा** अपराध.

### वाक्प्रचार

**अंग टाकणे** झोपणे, **दुखणे जिवावर बेतने** खूप त्रास होणे, **क्षण न् क्षण वेचणे** आयुष्य वेचणे, **पाय धरणे** शरण जाणे.

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

१. महाराजांचे पूर्ण नाव काय आहे ?

२. गुजरातेतील कोणत्या जमातीचे नाव धड्यात आले आहे ?

३. महाराज संध्याकाळी कोठे निघाले होते ?

४. महाराजांनी आपले आयुष्य कशासाठी वेचले ?

५. महाराजांनी गुन्हयाचे मूळ कशात सांगितले ?


**२. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१. सरकारने हजेरीचा तोडगा का काढला ?

२.महाराजांना उपास का करावा लागत असे ?

३. गुन्हेगार जमातीच्या हितासाठी महाराजांनी कोणते प्रयत्न केले ?

**३. खालील चित्रावरून दोन-दोन वाक्य लिहा :**



१.-------------------------------------------
२.-------------------------------------------
३.-------------------------------------------
४.-------------------------------------------
५.-------------------------------------------
६.-------------------------------------------
७.-------------------------------------------
८.-------------------------------------------

**४. खालील वाक्ये पाठाच्या क्रमानुसार लिहा :**

१. ''मी जरा बडोद्याला चाललो आहे.''

२. एकदा एका मुलाला कुत्रे चावले.

३. ''तू राहा बाबा मुलाजवळ.''

४. चोऱ्यामाऱ्या करणे, दरोडे घालणे, हाच या जमातीचा पूर्वी धंदा होता.

५. गवताच्या बिछान्यावर त्यांनी अंग टाकले.

**५. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

(१) थोर =------ (२) तुरूंगे =----(३) तोडगा =-----

(४) मजल =------ (५) रात्र = --- (६) बिछाना =-----

**६. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

(१) वर x-----(२) वाईट x----- (३) रात्रे x-----

(४) आत x----- (५) जागणे x-----(६) सुख x-----

**७. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :**

(१) अंग टाकणे (२) क्षण न् क्षण वेचणे (३) दुखने जिवावर बेतणे.

**८. उदाहरणाप्रमाणे वाक्ये लिहा :**

उदाहरण : **महाराजा येत आहे .**

**महाराज येत होते.**

**महाराज येणार आहेत.**

(१) कविता गाणे गात आहे. ---------- ------------

(२) मी चिकू खात आहे. ---------- ------------

(३) पाउस येत आहे. ---------- ------------

**९. खाली दिलेल्या परिच्छेदाचे सुलेखन करा :**

पण मुलाचा बाप म्हणाला, ''नाही बाबूजी, मी कसा राहू ? माझ्या शेताची सगळी कामं तुंबली आहेत. इथं बसून राहू आणि वर्षभर काय खाऊ ?''

**१०. खालील शब्द शब्दकोशाचा क्रमात लावा :**

महाराज, गुजरात, वडोदरा, पाटणवाडी, जमात

१)-----(२) ----- (३) ----- (४) ----- (५) -----

**प्रवृत्ती**

- ग्रंथालय, मासिके आणि वर्तमानपत्र्यातून प्रसंग अथवा गोष्ट मिळवा व वाचा.
- गोष्टींचा अंक तयार करा.

# ४. सशाचे रक्षण कसे झाले ?

बऱ्याच वर्षांपूर्वी श्रीचक्रधर स्वामी नावाचे थोर महात्मा होऊन गेले. 'प्राणिमात्रांवर दया करावी, कोणत्याही जिवाला त्रास देऊ नये, कोणताही जीव मोठा किंवा छोटा मानू नये,' अशी त्यांची शिकवण होती.

एकदा काय झाले, रानात दोन शिकाऱ्यांमध्ये शर्यत लागली. 'ज्यांची कुत्री ससा धरतील, तो शर्यत जिंकेल, अशी अट होती. मग त्यांनी झुडपातून एक ससा उठवला. ससा घाबरून जोरात पळू लागला. श्रीचक्रधर स्वामी एका मोठ्या झाडाखाली शांत बसले होते. घाबरलेल्या सशाला त्यांनी पाहिले. ससा त्यांच्याजवळ जाऊन थांबला. श्रीचक्रधर स्वामींनी त्याला प्रेमाने कुरवाळले.

इतक्यात कुत्री आणि शिकारी श्रीचक्रधर स्वामींजवळ पोचले. शिकाऱ्यांनी श्रीचक्रधर स्वामींना ससा देण्याची विनंती केली.



"जी ! जी ! ससा सोडावा." शिकारी म्हणाले.

"हा ससा मी तुम्हांला देणार नाही." श्रीचक्रधर स्वामी म्हणाले.

शिकारी म्हणाले, "स्वामी, हा आमच्या शर्यतीतला ससा आहे, तो आम्हांला द्यावा."

"शरण आलेल्या कोणत्याही जिवाला जीवन दयायचे असते. हा ससा रानात राहतो, गवत खातो, ओढ्या-नदीचे पाणी पितो. त्याला झुडपातून का उठवले ? त्याने तुमचे काय बिघडविले ? विनाकारण का मारता तुम्ही त्याला ?" श्री चक्रधर स्वामी म्हणाले.

श्रीचक्रधर स्वामींच्या बोलण्यावर शिकाऱ्यांनी विचार केला. त्यांना स्वामींचे म्हणणे मनोमन पटले.त्यांना वंदन करत ते म्हणाले, "खरं आहे महाराज तुमचं. आता आम्ही कोणत्याही प्राण्याला मारणार नाही." असे म्हणून शिकारी निघून गेले.

श्री चक्रधर स्वामींना आनंद झाला. त्यांचा चेहरा प्रसन्न दिसू लागला. त्यांनी हलकेच आपली मांडी उचलली आणि ते सशाकडे पाहून म्हणाले, "पळा आता." मग सशाने एकदम धूम ठोकली.

## शब्दार्थ

**थोर** महान, **महात्मा** महान व्यक्ती, **शिकवण** उपदेश, **शरण** आश्रय, **वंदन** नमस्कार, **प्रसन्न** समाधानी, **शर्यत** स्पर्धा.

## वाक्प्रचार

**धूम ठोकणे** वेगाने धावणे, **शरण देणे** आश्रय देणे, **वंदन करणे** नमस्कार करणे.

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :

१. झाडाखाली कोण बसले होते ?

२. शर्यत कोणाकोणा मध्ये लागली होती ?

३. घाबरलेल्या सशाला पाहून चक्रधर स्वामींनी काय केले ?

४. ससा देण्याची विनंती कोणी केली ?

५. शिकारी निघून गेल्यावर चक्रधर स्वामींचा चेहरा कसा दिसू लागला ?

६. चक्रधर स्वामी शेवटी सशाला काय म्हणाले ?

**२. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१. चक्रधर स्वामींची सर्वांना काय शिकवण होती ?
२. चक्रधर स्वामी शिकाऱ्यांना काय म्हणाले ?
३. चक्रधर स्वामींना वंदन करीत शिकारी काय म्हणाले ?
४. चक्रधर स्वामी सशाला काय म्हणाले ?

**३. कारणे लिहा :**

१. ससा जोरात पळू लागला, कारण की...
२. शिकाऱ्यांनी श्रीचक्रधर स्वामींना वंदन केले, कारण की....
३. शिकारी ससा सोडत नव्हते, कारण की....

**४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

१. महान-----२. शरण ----- ३.वंदन----- ४.रान----- ५. नदी ---- ६ाणी ----

**५. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

१. शांत ----- २. जवळ ----- ३. सकाळ ----- ४. आनंद -----

**६. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा :**

(१) शरण येणे (२) वंदन करणे (३) धूम ठोकणे

**७. खालील वाक्य कोण-कोणास बोलले ते लिहा :**

(१) "हा ससा मी तुम्हाला देणार नाही."
------------------------------------------
(२) "स्वामी हा आमच्या शर्यतीतला ससा आहे, तो आम्हाला दयावा."
------------------------------------------
(३) "पळा आता."
------------------------------------------

**८. खाली दिलेल्या शब्दामधून योग्य शब्दांवर ☑ करा :**

(१) कोणत्याही जिवाला तरास / त्रास देऊ नये.
(२) रानात दोन शिकाऱ्यांमध्ये शर्यत / सर्यत लागली.
(३) इतक्यात कुतरी / कुत्री आणि शिकारी आले.
(४) हा ससा राणात / रानात राहतो.
(५) त्यांचा चेहरा प्रसन्न / प्रशन्न झाला.

**९. खालील शब्द शब्दकोशाच्या क्रमाने लिहा :**

ससा, कुत्रा, जीवन, शिकारी, वंदन
(१)-----(२) ----- (३) ----- (४) ----- (५) -----

**प्रवृत्ती**

- ग्रंथालय, मासिके आणि वर्तमानपत्रातून संताच्या गोष्टी अथवा प्रसंग मिळवून वाचा.
- प्राण्यांविषयीच्या लहान लहान गोष्टीचां अंक तयार करा.

•

# पुनरावर्तन – १

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तर लिहा :**

१. सखारामने माकडांवर काय उगारले होते ?

२. भेंडी का रडत आहे ?

३. महाराज संध्याकाळी कोठे निघाले होते ?

४. झाडाखाली कोण बसले होते ?

५. चक्रधर स्वामी शेवटी सशाला काय म्हणाले ?

**२. खालील शब्दांचे वाक्यात उपयोग करा :**

१. माकड :------------------

२. हुषार : ------------------

३. महाराज :-----------------

४. थोर :-------------------

५. शिकारी : ----------------

**३. खालील दोन्ही शब्दांचा उपयोग करून वाक्य बनवा :**

**उदाहरण : माकड, टोपी – माकडाने टोपी घातली.**

१. झाड, पक्षी ------------------------

२. भेंडी, भाजी ------------------------

३. मुलगा, हुषार ------------------------

४. आई, प्रेम ------------------------

५. शिकारी, ससा ------------------------

**४. तुम्हाला आवडणाऱ्या झाडाविषयी सात-आठ वाक्य लिहा :**

**५. काव्यपंक्ति पूर्ण करा :**

गोरा गोरा........................

.....................बसला, मुळा !

**६. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

१. घेर ---- २. मजला ----- ३. थोर ----- ४. सौम्य ----- ५. कबूल ----- ६. शर्यत -----

**७. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

१. आत ----- २. खाली ----- ३. रात्र -----४. शांत----- ५. सकाळ----- ६. जवळ -----

**८. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा :**

(१) अंग टाकणे (२) पाय घरणे (४) घूम ठोकणे (४) वंदन करणे.

**९. खालील परिच्छेद तुमच्या वहीत सुंदर अक्षरात लिहा :**

एकदा काय झाले, रानात दोन शिकाऱ्यांमध्ये शर्यत लागली, "ज्यांची कुत्री ससा धरतील, तो शर्यत जिंकेल." अशी अट होती मग त्यांनी झुडपातून एक ससा उठवला. ससा घाबरून जोरात पळू लागला. श्रीचक्रधर स्वामी एक मोठ्या झाडाखाली शांत बसले होते. घाबरलेल्या सशाला त्यांनी पाहिले. ससा त्यांच्या जवळ जाऊन थांबला, श्रीचक्रधर स्वामींनी त्याला प्रेमाणे कुरवाळले.

**१०. खालील शब्द शब्दकोशाच्या क्रमाणे लिहा :**

राजा, कबूल, गोड, भेंडी, माकड

(१)-----(२) ----- (३) ----- (४) ----- (५) -----

•

# ५. कोडे

(१) हातपाय तिचे
काकडून झाले वाकडे
पानजाळीतून डोकावले
गोल गोल आकडे



(२) काळे काळे रान
उभे सभोवार
काळ्या काळ्या रानी
एक तलवार उभी



(३) काळे भोर
एवढेसे पोर
राखते घर
येणार नाही
मुळीच चोर



(४) इथे आहे, तिथे आहे
मागे आहे, पुढे आहे
वर आहे, खाली आहे
दिसत नाही, पण लागते



(५) पहा करामत, चला, हुशार
झटपट – शिजवुन अन्न तयार
यंत्रे फिरती सर सर सर
दिवे लागती भर भर भर
कामे करते परो परी
कोण बरे ही नवी परी



(६) एक पान दुसर पान,
पानात आहे पान हिरवी –
पांढरी पानंच पान,
सांगा माझ नाव



(७) आकाशी उडतो पण, पक्षी नव्हे
शेपूट आहे पणी प्रामी नव्हे
डोळे आहेत पण, माणूस नव्हे
सांगा पाहू मी कोण ?



(८) जन्मापासून एकटा
दूर दूर आकाशात
पृथ्वीभोवती अखंड
फिरतो मी दिनरात



- वर दिलेली कोडी सोडवून योग्य त्या क्रमाने उत्तरे लिहा :
  (१)-----(२) ----- (३) ----- (४) -----
  (५) -----(६)-----(७) ----- (८) -----

### शब्दार्थ

**करामत** खुबी, कौशल्य, हुषारी, **अखंड** सतत, न खंड पडता, न थांबता.

### स्वाध्याय

**१. खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :**

१. पानांतून कशाचे आकडे डोकावतात ?
२. कवीने कोबीचे वर्णन कसे केले आहे ?
३. घराची राखण कोण करीत आहे ?
४. काळ्या रानातली तलवार असे कोणाला म्हटले आहे ?
५. पृथ्वी भोवती अखंड कोण फिरते आहे ?

**२. तुम्हाला दिलेल्या कोड्याव्यतिरिक्त अजून काही कोडी शोधून काढा व लिहा :**

**३. खाली दिलेल्या कोष्टकातून कोड्यातील उत्तराभोवती खूण करा :**

| | | | |
|---|---|---|---|
| चिं | च | ग | ज |
| कुं | भां | बी | वी |
| लू | को | ज | वा |
| प | तं | रा | ह |
| | द्र | चं | |

**( ४ ) खाली दिलेल्या शब्दानां समानार्थी शब्द लिहा :**

(१) पोर -----(२) पान ----- (३) आकाश ----- (४) पक्षी ----- (५) पृथ्वी ---

**५. खाली दिलेल्या शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा :**

(१)वाक डे---(२)दन ----(३)काळे ----(४)उत्तर----(५)लहान-----(६)हुशार----

**६. खाली दिलेल्या अनेक शब्दांसाठी एक शब्द लिहा :**

१. पानाच्या आत पाने असलेली भाजी -------------------

२. सर्व ठिकाणी आहे, पण दिसत नाही अशी ---------------

३. चोरापासून रक्षण करणारी लहानशी वस्तू ----------------

**७. उदाहरणाप्रमाणे कशी, कसा, कसे शब्द लिहा :**

**उदाहरण - चंद्र - कसा**

(१) चिंच ----(२) पतंग ----(३) हवा ----

(४) बीज ----(५) कुलूप ---- (६) केसातला भांग----

**८. उलटसुलट झालेली अक्षरे योग्य त्यां क्रमाने लिहा :**

(१) गलो ----(२) रवासभो ----(३) तमराक ----(४) टशेपू----

**९. खालील शब्द शब्दकोशाप्रमाणे लिहा :**

चोर, तलवार, परी, एकटा.

(१)-----(२) ----- (३) ----- (४) -----

**प्रवृत्ती**

- कोडी व त्यावर आधारलेली चित्रे यांचा अंक बनवा.
- 

# ६. गवतफुला रे गवतफुला

- इंदिरा संत

रंगरंगुल्या, सानसानुल्या,
गवतफुला रे गवतफुला,
असा कसा रे मला लागला,
सांग तुझा रे तुझा लळा.
मित्रासंगे माळावरती,
पतंग उडवित फिरताना
तुला पाहिले गवतावरती,
झुलता झुलता हसताना;
विसरून गेलो पतंग नभिचा,
विसरून गेलो मित्राला
पाहुन तुजला हरखुन गेलो,
अशा तुझ्या रे रंगकळा.
हिरवी नाजुक रेशिमपाती,
दोन बाजुला सळसळती
नीळनिळूली एक पाकळी,
पराग पिवळे झगमगती,
तळी पुन्हा अन् गोझिरवाणी,
लाल पाकळी खुलली रे
उन्हामध्ये हे रंग पाहता,
भान हरपुनी गेले रे.
पहाटवेळी अभाळ येते,
लहान होउन तुझ्याहुनी
तुला भरविते निळ्या करांनी,
दवा-मोत्यांची कणी कणी.
गोजिरवाणा हो रविचा कर,
छाया होते इवलीशी
तुझ्यासंगती लपुन खेळती,
रमून जाती अशी तशी.
रंगरंगुल्या, सानसानुल्या
गवतफुला, रे गवतफुला
असा कसा रे मला लागला
सांग तुझा रे तुझा लळा



## शब्दार्थ

**सान** लहान
**लळा** माया, प्रेम
**संगे** बरोबर, सोबतीने
**नभ** आकाश
**हरखणे** आनंदणे
**रंगकळा** रंगाच्या विविध छटा
**रेशिमपाती** रेशमासारखे मऊ मऊ पान
**कर** हात
**पराग** फुलातील बिजांकुर
**दव** हिवाळ्यात पानांवर न फुलांवर पडलेले पाण्याचे थेंब
**रवि** सूर्य
**छाया** सावली
**इवलीशी** छोटीशी
**सानुले** लहानसे

## वाक्प्रचार

**हरखून जाणे** आनंदित होणे
**भान हरपणे** एखाद्या गोष्टीत दंग होऊन सर्व विसरणे

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

१. कवितेतील मुलाला कोणाचा लळा लागला आहे ?
२. मुलगा पतंग उडविण्यासाठी कोठे जाणार आहे ?
३. मुलगा कोणाला पाहून हरखून गेला आहे ?
४. मुलाने रंगरंगुल्या सानसानुल्या असे कोणाला म्हटले आहे ?
५. रेशीमपाती कोणत्या रंगाची आहेत ?

**२. फुलांचा उपयोग कशाकशासाठी करतात ते लिहा :**

**३. खाली दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा :**

१) तुला पाहिले ..............................
...............................पतंग नाभिचा.

२) पहाटवेळी .................. ............
.................................कणी कणी.

## ४. सूचनेप्रमाणे लिहा :

१) इवली – इवलीशी (२) मोठी ---------

३) लहान ------- (४) छोटी ---------

५) बारिक ------ (६) सुंदर ---------

● **शेवटी 'वाणी' येईल असे शब्द लिहा :**

१) गोजिरवाणी

२)

३)

४)

५)

● **नमुन्याप्रमाणे लिहा :**

१) कुत्रा – कुत्री

२) चिमणा ---

३) ---- बकरी

४) कोंबडी ----

५) ---- बेडकी

६) मुलगा ----

● **तुम्हाला माही असलेल्या सुगंधित फुलांचा नावे लिहा :**

१) ------२)----- ३)----- ४)----- ५)----- ६)------

● **पांढऱ्या रंगाच्या फुलांची नावे लिहा :**

१)------ २)------ ३)------ ४)------ ५)------ ६)------

## ५ ) खाली दिलेल्या शब्दकोड्यामधून फुलांची नावे शोधा आणि फुलांची नावे व त्यांचे रंग लिहा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रा | त | रा | णी | ई |
| न | ग | चा | जु | मो |
| फू | र | ब | फा | ग |
| ल | कु | इ | झें | रा |
| ळ | जा | स्वं | दी | डू |

### प्रवृत्ती

● **वेगवेगळ्या ऋतुत मिळणाऱ्या फुलांची यादी करा. व त्यांची चित्रे जमवून त्याचा तक्ता तयार करा.**

●

# ७. प्रेमाचा महिमा

एकदा एक माणूस रागाने लालेलाल होऊन भगवान बुद्धाजवळ आला. येताक्षणीच त्याने भगवान बुद्धावर शिव्यांची लाखोळी वाहिली. माणसाला वाटले, शिव्या ऐकून भगवान बुद्ध रागावतील. पण ते तर शांतच होते. त्यांच्या प्रसन्न चेह–यावर काहीच फरक पडला नाही. त्यामुळे माणूस फारच चिडला आणि जास्तच शिव्या देऊ लागला. तरीही बुद्ध शांत राहून हसतच होते.त्यांच्या डोळ्यांत करूणा दिसत होती. शिव्या देऊन देऊन शेवटी माणूस थकला आणि म्हणाला, "मी तुम्हांला इतक्या शिव्या देतो आहे, तरी तुम्ही मात्र एक शब्दही बोलत नाहीत, असे का ?"

"अरे बंधू ! तुझ्या शिव्यांपैकी एकही शिवी मी घेतलेली नाही," भगवान बुद्ध शांतपणे म्हणाले.

"तुम्ही शिव्या ऐकल्या हे तर खरे ना !"

"मला शिव्यांचा काही उपयोगच नाही, तर त्या मी ऐकू तरी कशाला ?"

"तर मग मी दिलेल्या शिव्यांचे काय झाले ?" माणसाने रागारागाने विचारले.

"त्या सर्व तुझ्याजवळच राहिल्या आहेत."

"पण मी तर तुम्हांलाच शिव्या दिल्या होत्या."

"पण मी तर तुझी एकही शिवी स्वीकारलेली नाही."



आता मात्र ब्राह्मण विचारात पडला, "म्हणजे याचा अर्थ काय ?"

भगवान बुद्धाने त्याला प्रेमाने जवळ घेतले आणि म्हणाले, "अरे मित्रा, समज,तुझ्या खिशात थोडी नाणी आहेत. ती तू कोणाला तरी देऊ इच्छितोस. पण त्याने ती घेतलीच नाहीत, तर ती नाणी कोणाजवळ राहतील ?"

"अर्थात ती नाणी माझ्याजवळच राहतील." माणसाने सांगितले.

"अगदी बरोबर. तुझ्या शिव्यांचे देखील त्या नाण्यांसारखेच आहे. तू मला शिव्या देत राहिलास. पण मी तर त्या स्वीकारल्याच नाहीत. त्यामुळे त्या शिव्या तुझ्याजवळच राहिल्या नाहीत का ?" भगवान बुद्धाने त्याला समजावले.

आता त्या माणसाच्या डोक्यात प्रकाश पडला. शिव्या ऐकणा–याने शिव्या स्वीकारल्या नाहीत, तर त्या जो शिव्या देत असतो, त्याच्याजवळच राहतील, हे त्याला कळून चुकले. त्या माणसाला भगवान बुद्धाची थोरवी पटली.

### शब्दार्थ

**चिडणे** रागावणे **बंधू** भाऊ, **स्वीकार करणे** घेणे

### वाक्प्रचारे

**रागाने लालेलाल होणे** खूप राग देणे

**शिव्यांची लाखोली बाहणे** खूप शिव्या दणे`

**डोक्यात प्रकाश पडणे** एखादी गोष्ट समजणे

### टीप

**भगवान बुद्ध** भगवान बुद्धांचे मूळ नाव सिद्धार्थ होते. ते बुद्ध धर्माचे संस्थापक होते.

### स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :**

१. भगवान बुद्धांजवळ येताक्षणी माणसाने काय केले ?

२. भगवान बुद्धांच्या डोळ्यात काय दिसत होते ?

३. रागावलेल्या माणसाला बुद्धाने कोणात्या प्रकारे हाक मारली ?

४. शीव्या ऐकणाऱ्याने जर शिव्या स्वीकारल्या नाहीत तर त्याचे काय होते ?

**२. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१. माणूस जास्त चिडून आणखी शिव्या का देऊ लागला ?
२. माणूस विचारात का पडला ?
३. भगवान बुद्धाने माणसाला प्रेमाने जवळ घेऊने काय सांगितले ?
४. भगवान बुद्धांची थोरवी पटल्यावर माणसाने काय केले ?

**३. भगवान बुद्धांविषयी चार वाक्ये लिहा :**

----------------------------------
----------------------------------

**४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

१. राग ----२. माणूस ---- ३. डोळे ----.४. बंधू -----५. भगवान---- ६. उजेड ---

**५. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

१. हसणे ----२. शांत ---- ३. जास्त ---- ४. घेणे ---- ५. शेवट ---- ६. मित्र ----

**६. नमून्या प्रमाणे लिहा :**

शांत – शांतपणे
१. उघड ---- २. नीट ------ ३. थंड ----- ४. व्यवस्थित -----

**७. खालील शब्द खेळातून धड्यात येणारे पाच शब्द शोधा आणि वाक्य बनवा :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ला | ना | क | रु | णा |
| ल | ले | णी | शि | उ |
| चि | डे | ला | व्य | प |
| ख | फा | खो | ल | यो |
| थो | र | वी | रा | ग |

**उदाहरण : लालेलाल – तो रागाने लालेलाल झाला .**

(१)--------------------------
(२) ----- --------------------
(३) ------------------------

**८. तुमचे विचार लिहा :**

मी देव असलो तर ----------------------------
------------------------------------------
------------------------------------------

मला व्हायचे आहे -----------------------------
------------------------------------------
------------------------------------------

**९. तर तुम्ही काय कराल ?**

१. माणसाच्या जागी जर तुम्ही गेला असता तर ?
२. बुद्धांच्या ठिकाणी तुम्ही असता तर ?

**प्रवृत्ती**

- **बुद्धांच्या जातक कथा मिळवून वाचा.**

# पुनरावर्तन - २

१. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :

१. घराची राखण कोण करतो ?

२. रेशीमपाती कोणत्या रंगाची आहेत ?

३. भगवान बुद्धाच्यां डोळ्यात काय दिसत होते ?

२. भगवान बुद्धांविषयी पांच-सहा वाक्ये लिहा :

-----------------------------------------------

----------------------------------------------

-----------------------------------------------

----------------------------------------------

----------------------------------------------

३. कोणतेही दोन कोडी लिहा :

४.

● वरील गोष्टीवरून तीन प्रश्न बनवा आणि त्याचे उत्तर तुमच्या मित्राला विचारा.

प्रश्न

१.

२.

३.

५. खालील म्हणींचा अर्थ लिहून त्यासारख्या अन्य म्हणी लिहा :

● करावे तसे भरावे :

● अर्थ :

१.

२.

३.

४.

## ६. तुमच्या विस्ताराचे एक लोकगीत लिहा :

----------------------------

----------------------------

----------------------------

----------------------------

----------------------------


----------------------------

## ७. खालील शब्दावरून दाखविल्या प्रमाणे शब्द बनवून लिहा :

**उदाहरण : सुरत – सुर, सुत, तर.**

- अहमदाबाद ----- ----- ----- ------
- भावनगर ----- ----- ----- ------
- नगरपालिका ----- ----- ----- ------
- वातावरण ----- ----- ----- ------

## ८. शब्द कोडी पूर्ण करा :



**आडवी चावी**

१) झाडावर उड्या मारणारा एक प्राणी

६) सुंदर

८) मुळाचे नाव

९) हयातून पाणी येते

**उभी चावी**

१) पाण्यात राहणारा

४) शंकराच्या हातातील वाद्य

६) मनुष्याच्या पाहण्याचा अवयव

५) संक्रातीत मुले आकाशात उडवितात

७) आकाश

## ९. रेखांकित शब्दांऐवजी कौसांतील शब्दांचा उपयोग करून वाक्य पुन्हा लिहा :

१. <u>रमेश</u> गाणे गाता होता. (रेखा)

२. झाड वर <u>पक्षी</u> बसले होते. (कावळा)

३. <u>माट</u> पाण्याने भरला होता. (बादली)

४. <u>मुलगा</u> केळी खात होता. (मुली)

५. <u>विद्यार्थी</u> रोज अभ्यास करतात. (मी)

# ८. पत्रलेखनाची मजा

माझे नाव स्मिता गिरीष पवार. गाव जळगाव. आमच्या गावात एक मोठे वडाचे झाड आहे. झाडाच्या शेजारीच आमची शाळा आहे. आमच्या वर्गशिक्षकांचे नाव श्री सुहास कोल्हे. ते आम्हाला खूप प्रेमाने शिकवितात. ते आम्हाला रागवत नाहीत आणि मारतपण नाहीत. आमची शाळा आम्हाला खूप आवडते. आमचे सर आम्हाला फक्त शाळेतच प्रेमाने शिकवितात असे नसून मधल्या सुट्टीतही आमच्याशी गप्पा मारतात. वाटेत भेटले की कसे आहात ? अशी आमची चौकशी करतात. अशा प्रेमळ शिक्षकांच्या हाताखाली शिकतांना जून महिना जाऊन आक्टोबर महिना केव्हा उजाडला ते कळलेच नाही.

दिवाळीची सुट्टी लागली. त्या आनंदातच आम्ही शाळेतून घरी जायला निघालो. वाटेतच आमचे सर आम्हाला भेटले. आम्ही सगळेजण त्या मोठ्या वडाच्या झाडाखाली गप्पा मारीत उभे राहिलो.

सरांनी आम्हाला विचारले ''मुलांनो दिवाळीच्या सुट्टीत काय काय करणार आहात ?''

''नवीन कपडे घेणार, फिरायला जाणार आणि दिवाळीच्या सुट्टीत आईने केलेले फराळाचे खाणार.'' आम्ही सगळेजण  हो म्हणालो.

कपिल म्हणाला ''सर तुम्ही तर आम्हाला दिवाळीच्या सुट्टीत विसरून जाल, पण आम्ही तुम्हाला अजिबात विसरणार नाही.''

सर म्हणाले, ''अरे कसा काय मी तुम्हाला विसरेन ? तुम्हा सगळ्यांना पत्र लिहीन ना !''

निखिल म्हणाला, ''सर पत्र कसे लिहायचे ते आम्हाला शिकवाल ?''

सर म्हणाले, ''मी लिहिलेले पत्र वाचा म्हणजे तुम्हाला कळेलच की पत्र कसे लिहायचे ते.'' आणि खरच सरानी लिहिलेले पत्र कालच मला मिळाले. वर्गातल्या विद्यार्थ्यांनी ते पत्र पुन्हा पुन्हा वाचले. हे पहा त्यांनी लिहिलेले पत्र वाचा.

**श्री सुहास एस. कोल्हे**
**बी-२६, अंबिका सोसायटी,**
**मु. पो. भायली,**
**जिल्हा - वडोदरा**
**२९-१०-१४**

प्रिय विद्यार्थ्यांनो

तुम्ही सगळेजण कसे आहात ? सगळे जण खूप मजा करीत असालच. मीपण माझ्या कुटुंबाबरोबर मजेत आहे. सुट्टीमध्ये खेळणे, नातेवाईकांकडे फिरायला जाणे यामध्ये तुम्हा सगळ्यांचा वेळ छान जात असेलच मला मात्र तुम्हा विद्यार्थांची खूप आठवण येते आणि म्हणून मी ठरविले की तुम्हा सगळ्यांना पत्र लिहावे. तुम्हीच विचारत होता ना, की पत्र कसे लिहायचे असते.

पत्र लिहिणाऱ्याने स्वतः चे नाव, पत्ता आणि तारीख पत्राच्या उजव्या हाताला लिहावे. आपल्या पेक्षा मोठ्या व्यक्तिनां पत्र लिहायचे असल्यास तीर्थरूप, आदरणीय, आणि मित्रांना किंवा आपल्या वयाच्या व्यक्तिनां प्रिय

असे लिहून सुरुवात करावी.

मोठ्यांना नमस्कार – छोट्यांना आशीर्वाद अशा पद्धतिने लिहावे त्यानंतर लहान लहान परिच्छेद पाडावेत व पत्र लिहिण्याचे कारणही लिहावे. पत्राच्या शेवटी वयोमानानुसार घरातील मोठ्यां व्यक्तिनां नमस्कार छोट्यांना आशीर्वाद असे लिहावे व पत्र पूर्ण करावे.

त्यानंतर पाकिटावर पत्र ज्याला लिहिणार आहोत त्याचे संपूर्ण नाव, पता, पिनकोड नंबर, लिहावा. व पाकिटाच्या दुसऱ्या बाजूस ज्याने पत्र लिहिले असले त्याचे नाव व पता लिहावा.

मित्रांनो पत्र लिहितांना अजून बऱ्याच गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात तरच आपण लिहिलेल पत्र वाचायला मजा येते.

- पत्र लिहितांना अक्षरे एकसारखी व व्यवस्थित असावीत.
- पत्रातील अक्षरे सरळरेषेत लिहावीत.
- दोन अक्षरांमध्ये, दोन शब्दांमध्ये व दोन ओळी मध्ये एक सारखे अंतर असावे.
- अक्षरे वळणदार असावीत छोटी किंवा मोठी खोडलेली नसावीत.
- अक्षरांचे वळणं एकसारखे असावे.
- विरामचिन्हाचा योग्य ठिकाणी उपयोग करावा.
- लिखाणामध्ये भाषेच्या चुका नसाव्यात.

आपण लिहिलेल्या पत्रात आपल्याला काय सांगायचे आहे ते स्पष्ट लिहावे.

मित्रांनो तुम्ही माझे पत्र वाचा व मलासुद्धां पत्र लिहा सुट्टीत तुम्ही काय केलेत. नवीन काय बघितले, नवीन काय काय करायला शिकलात ते सगळं कळवा. तुम्ही लिहितेली पत्रे मी शाळा सुरु झाल्यावर वर्गांमध्ये वाचून दाखवेन.

आधुनिक काळात मोबाईल, कॉम्प्युटर आणि ईमेलचा वापर वाढला आहे. त्यामुळे पत्र लिहिण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. परंतु पत्र लिहिण्यामध्ये व वाचण्यामध्ये एक वेगळया प्रकारचा आनंद मिळतो.

तुमच्या घरातील थोरांस नमस्कार सांगा तुम्हा मुलांना खूप खूप आशीर्वाद. तुम्ही सगळे आनंदात राहा.

**तुमचे सर**
**सुहास कोल्हे**

### शब्दार्थ

**वयोमानानुसार** **वयाप्रमाणे**
**पिनकोड** **पोस्टल ईन्डेक्स नंबर, तो सहा आकडी असतो.**

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

१. सुहाससर विद्यार्थ्यांना कशाप्रकारे शिकवितात ?
२. दिवाळीच्या सुट्टीमध्ये आई काय बनविते ?
३. आपल्यापेक्षा मोठ्या व्यक्तिनां पत्र लिहितांना प्रथम काय लिहावे ?
४. पत्राच्या शेवटी काय लिहावे ?

**२. पत्र लिहितांना कोणकोणती काळजी घ्यावी ?**

**३. तुमच्या घरी आलेली जुनी पत्रे वाचा आणि त्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१. पत्र कोणी लिहिले आहे ?
२. पत्रावर लिहिलेला पत्ता काय आहे ?
३. पत्रावर कोणती तारीख लिहिलेली आहे ?
४. पत्रांवर पोस्ट ऑफिसचा शिक्का आणि लिहिलेली तारीख वाचा व लिहा.

**४. खाली दिलेल्या शब्दांविषयी एका वाक्यात माहिती लिहा :**

१. पोस्टमेन ----------------------------
२. कॉम्प्युटर ---------------------------
३. मोबाईल ----------------------------
४. पोस्ट ऑफिस -------------------------
५. कबूतर -----------------------------

**५. खालील वाक्ये कोण म्हणाले ते लिहा :**

१. "मुलांनो दिवाळीच्या सुट्टीत काय काय करणार आहात ?"
२. "सर तुम्ही तर आम्हाला दिवाळीच्या सुट्टीत विसरून जाल."
३. "सर पत्र कसे लिहायचे ते आम्हाला शिकवाले ?"

**६. पोस्ट ऑफिसला भेट द्या व तेथे काय काय मिळते ? त्यांची किंमत काय आहे ? त्याची माहिती मिळदा व नोंद करा.**

### प्रवृत्ती

**तुमच्या घरी लग्नाचे आमंत्रण पत्रिका, वाढदिवस कार्डस, शुभेच्छापत्र आली असतील ती गोळा करा व वर्गातील मित्रांना दाखवा त्या विषयी शिक्षकांशी चर्चा करा आणि नवीन शुभेच्छा कार्ड तयार करा.**

•

# ९. मोर अंगणी नाचतो

मोर अंगणी नाचतो
मोर छुम छुम छुम नाचतो !


ढग आभाळी दाटती
धारा पाण्याच्या फुटती
थेंब चोचीने वेचतो
मोर अंगणी नाचतो !

मोर पिसारा उघडी
संगे नाचती सौंगडी
भुई अलगद टोचतो
मोर अंगणी नाचतो !

मोर पिसारा थरथरे
पाचू, इंद्रनीळ, हिरे,
तुरा रत्नांनी खचतो
मोर अंगणी नाचतो !

मोर वेळावतो मान
निळी सोनेरी कमान
चोच पिसांत खोचतो
मोर अंगणी नाचतो !

मोर बोलावतो ढगा
लाभ पावसाचा जगा
दासी सागर साचतो
मोर अंगणी नांचतो !



## शब्दार्थ

**आभाळ** आकाश, **संगे** सोबत, बरोबर, **सौंगडी** मित्र, सोबती, **भई** जमीन, **अलगद** हळूच हलकेच, **वेळावतो** वळवतो **लाभ** फायदा, **सागर** समुद्र.

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात द्या :

१. मोर कुठे नाचतो आहे ?

२. मोराच्या सोबत कोण नाचत आहेत ?

३. मोराचा तुरा कशाने भरलेला आहे ?

४. मोर पिसांत काय खोचत आहे ?

५. मोर ढगांना का बोलवत आहे ?

### २. उदाहरणांनुसार वाक्ये तयार करा :

१. मोर

वाक्य ------------------

२. आभाळ

वाक्य -------------------

३. सौंगडी

वाक्य-------------------------

४. तुरा

वाक्य------------------------

५. लाभ

वाक्य -----------------------

### ३. खालील काव्यपंक्ति पूर्ण करा :

१. मोर अंगणी -------------------

---------------------------

---------------------------

------------------थेंब चोचीने वेचतो

२. मोर बोलावतो --------------------

-----------------------------

-----------------------अंगणी नाचतो

**४. खालील शब्दांसाठी काव्यात कोणते शब्द वापरले आहेत ते शोधून लिहा :**

मेघ ----- आकाश -- -- मित्र -- -- जमीन --- --फायदा -- --- समुद्र --- --

**५. खाली दिलेल्या रिकाम्या जागेत कवितेतील योग्य शब्द शोधून लिहा :**

मोर अंगणी – नाचतो

ढग आभाळी -----------

भूई अलगद ----------

धारा पाण्याच्या ---------

तुरा रत्नांनी ----------

**६. खालील शब्द शब्दकोशाच्या क्रमानुसार लिहा :**

मोर, ढग, आभाळ, पाचू, सागर

(१)-----(२) ----- (३) ----- (४) ----- (५) ---


**प्रवृत्ती**

**निसर्गाने निर्माण केलेल्या वस्तूंची यादी तयार करा.**

# १०. मूर्खांची यादी

एकदा अकबर बादशहाने बिरबलला मूर्खांची यादी तयार करण्याची आज्ञा केली. बिरबलने खूपच मेहनत घेऊन यादी तयार करण्याचे काम सुरू केले.

त्या दरम्यान घोड्यांचा एक व्यापारी जातिवंत उत्तम घोडे घेऊन बादशहाकडे आला होता. बादशहाने सर्वच घोडे विकत घेतले आणि घोड्यांची किंमत म्हणून त्याने मागितले तेवढे पैसे त्याला दिले. शिवाय तो व्यापारी पुन्हा दिल्लीला येईल, तेव्हा त्याने आणखी घोडे घेऊन यावेत, असे बादशहाने सांगितले, त्यासाठी त्याला आगाऊ



मोठी रक्कम देऊन ठेवली.

दरम्यान बिरबलने मूर्खांची यादी तयार करण्याचे काम पूर्ण केले होते. त्याने ती यादी बादशहाला दिली, त्या यादीत पहिले नाव अकबर बादशहाचेच होते. ते पाहून अकबर रागावला आणि म्हणाला, ''बिरबल, तुझी इतकी हिंमत झालीच कशी ? तू मलाच मूर्ख समजतोस काय ?''

''महाराज, एका अनोळखी व्यापाऱ्याला घोड्यांच्या खरेदीसाठी अगोदरच तुम्ही सर्व पैसे दिलेत, हे व्यावहारिक दृष्टिने चुकीचे आहे. हा मूर्खपणाच नव्हे का ? म्हणून मी आपले नाव यादीत सर्वप्रथम लिहिले आहे.''

अशा रीतीने एका अनोळखी माणसाला एवढे पैसे अगोदरच दयायला नको होते, हे बिरबलचे म्हणणे बादशहाला पटले होते, तरी देखील त्याने शंका काढली, ''पण तो घोडे घेऊन पुन्हा आला तर ?''

बिरबल म्हणाला, ''मग त्याच्यासारखा मूर्ख दुसरा कोण असेल ? जर तो घोडे घेऊन येथे पुन्हा आला, तर मी मूर्खाच्या यादीतून तुमचे नाव खोडून टाकीन आणि त्या जागी त्याचे नाव घालीन, शिवाय महाराज, मूर्खांच्या यादीत माझे देखील नाव आहे.''

बादशहा म्हणाला, ''या यादीत तुझे नाव का बरे घातले आहेस ?''

बिरबला म्हणाला, ''महाराज, मूर्खांना शोधून त्यांची यादी करण्यात मी माझा अमूल्य वेळ वाया घालवला आहे. यावरून मी देखील मूर्ख आहे, हे सिद्ध झाले आहे. खरं तर, या वेळेचा मी दुसऱ्या एखाद्या चांगल्या कामासाठी वापर करू शकलो असतो.''

हे ऐकून बादशहाने बिरबलच्या चातुर्याचे कौतुक केले.

## शब्दार्थ

**आज्ञा** हुकम, **जातिवंत** चांगल्या प्रकारचे, **उत्तम** छान, **आगाऊ** अगोदर, आधी **हिंमत** धीर, **अनोळखी** ओळख नसणारा, **व्यावहारिक** व्यवहाराकच्या दृष्टिने योग्य **सर्वप्रथम** सर्वात आधी , **पटणे** – योग्य वाटणे, **अमूल्य** किंमती, **वापर करणे** उपयोग करणे, **चातुर्य** हुशारी, **दरम्यान** विशिष्ट वेळेत

## वाक्प्रचार

**सिद्ध करणे** खरे करून दाखविणे, **वेळ वाया घालविणे** वेळ फुकट घालविणे

टीप :

**अकबर :** मोगल वंशाचा एक दयाळू राजा

**बिरबल :** अकबरचा एक दरबारी, तो बुद्धिचातुर्य तसेच हजरजवाबीपणासाठी प्रसिद्ध होता.

## स्वाध्याय

### १. खलील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :

१. अकबराने बिरबलाला काय करण्याची आज्ञा केली ?

२. मूर्खांच्या यादीत पहिले नाव कोणाचे होते ?

३. बिरबलाचे कोणते म्हणणे बादशहाला पटले होते ?

४. बादशहाने बिरबलाच्या कोणत्या गोष्टीचे कौतुक केले ?

**२. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१. बादशहाने व्यापाऱ्याला आगाऊ मोठी रक्कम का देऊन ठेवली होती ?

२. अकबर बिरबलावर का रागावला ?

३. घोड्याचा व्यापारी जर घोडे घेऊन पुन्हा आला असता तर बिरबल काय करणार होता ?

४. बिरबलाने स्वतःचे नाव मूर्खांच्या यादीत का घातले होते ?

**३. खालील वाक्य कोण बोलले आहे ते लिहा. तसेच वाक्यांचे अनुलेखन करा :**

१. "बिरबल, तुझी इतकी हिंमत झालीच कशी ? तु मला मूर्ख समजतोस काय ?"

..........................................................................................

..........................................................................................

२. "महाराज, एका अनोळखी माणसाला ऐवढे पैसे अगोदरच द्यायला नको होते."

..........................................................................................

..........................................................................................

३. "मग त्याच्यासारखा मूर्ख दुसरा कोण असेल ?"

..........................................................................................

..........................................................................................

४. "या यादीत तुझे नाव का बरे घातले आहेस ?"

..........................................................................................

..........................................................................................

**४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

१. आज्ञा ---- २.खूप ---- ३.बादशहा---- ४.हिंमत --- ५.अमूल्य ---- ६.चातुर्य ---

**५. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

१. मूर्ख---- २.घेणे ----३.आधी---- ४.पहिले---- ५. मोठी---- ६.पूर्ण------

**६. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :**

१. ओळख नसणारा ------------------------------

२. व्यवहाराच्या दृष्टिने योग्य -------------------------

**७. शाळेच्या ग्रंथालयातून अशा गंमतीदार गोष्टी मिळवून वाचा तुम्हाला खूपच मजा आली असेल अशा दोन गोष्टींची नावे येथे लिहा .**

१.............................................. २.......................................................

**८. खालील शब्द उलट-सुलट वाचा :**

सर्कस, नयन, कालिका, नवजीवन

उलट-सुलट वाचले असता सारखे वाटतील असे दोन शब्द लिहा आणि दुसऱ्यांना वाचून दाखवा.

१........................................ २......................................................

## ९. खालील शब्दांना 'अ' लावून शब्द पुन्हा लिहा :

**उदा. मूल्य – अमूल्य**

असे दूसरे शब्द लिहा.

१. ..................... २. .................३. ...................... ४. ...........................

आता वर लिहलेल्या शब्दांचा उपयोग करून वाक्य तयार करा

उदाहरण : १. मूल्य – अमूल्य

वाक्य : मी माझा अमूल्य वेळ वाया घालवला आहे.

२. ....................................................................................................

वाक्य ------------------------------------------------

३. ...................................................................................................

वाक्य ------------------------------------------------

४. ..................................................................................................

वाक्य -----------------------------------------------

## १०. खालील शब्द शब्दकोशाच्या क्रमानुसार लिहा :

**आज्ञा, उत्तम, , एक , अकबर, ऐक , इतकी**

(१)-----(२) ----- (३) ----- (४) ----- (५) -----(६)-------

### प्रवृत्ती

**ग्रंथालयातून अकबर-बिरबल, तेनाली रामा इत्यादी च्या चातुर्य कथा मिळवून वाचा.**

●

# ११. मौलाना अबुल कलाम आझाद



सुमारे पासष्ट वर्षांपूर्वीची गोष्ट. लाहोरच्या सभागृहाकडे लोकांची खूप गर्दी लोटली होती हे लोक जमले होते कलकत्त्याच्या एका प्रसिद्ध संपादकाचे भाषण ऐकण्याकरिता, सर्वांचे डोळे व्यासपीठकडे लागले होते. त्या संपादकाला पाहण्यासाठी लोक उत्सुक झाले होते.

एवढ्यात एक कोवळा तरुण व्यासपीठावर आला आणि मुख्य खुर्चीवर बसला. लोक थक्क झाले, सभागृहात चुळबूळ सुरू झाली. काहींना तर वाटले, शेजारच्या खुर्चीवर जे लठ्ठ गृहस्थ बसले होते, तेच संपादक असतील, त्यांनी आपल्या मुलाला मुख्य खुर्चीवर बसू दिले असेल. परंतु सभेला सुरुवात झाली आणि काय आश्चर्य !

लोक कुतुहलाने एकमेकांकडे पाहू लागले. तोच होता लोकाचा संपादक त्याचे भाषण ऐकताना सर्व लोक भान विसरून गेले. भाषण सुरेख झाले. त्याने सभा जिंकली.

हा छोटा संपादक म्हणजेच भारताचे सुपुत्र अबुल कलाम आझाद. त्यांनी वयाच्या चोविसाव्या वर्षी एक वर्तमानपत्र काढले. त्याचे नाव होते 'अल् हिलाल' या वर्तमानपत्राचा खप हां हां म्हणता पंचवीस हजारांवर गेला होता. लहान वयात किती मोठी कामगिरी केली होती त्यांनी !

त्यांची ही कामगिरी पाहून 'हा पुढे खूप मोठा होणार' हे भाकीत त्या वेळी कित्येकांनी केले असेल. ते भाकीत त्यांनी खरे करून दाखविले. त्यांच्या बद्दल पंडित नेहरूंनी असे उद्‌गार काढले की, "मौलाना आझाद यांचे ज्ञान पाहून मी आश्चर्याने थक्क झालो !"

भारताच्या स्वातंत्रलठ्यातही मौलाना आझाद पुढे होते. त्यांनी महात्मा गांधी, पंडित नेहरू यांच्याबरोबर खांद्याला खांदा लावून काम केले. अनेक वेळा त्यांना तुरुगवास भोगावा लागला.

पुढे असा एक दिवस उजाडला की, गांधीजींनी इंग्रजांना 'चलेजाव' असे निक्षून सांगितले. देशभर उठाव झाला. १९४२ ची चळवळ ती हीच. या काळात पंडित नेहरू आणि मौलाना आझाद हे अहमदनगर येथील तुरुंगात दोन–अडीच वर्षे एकत्र होते. तुरुंगात असतानाच मौलाना आझाद यांच्या पत्नी वारल्याची तार आली. अशा वेळीही इंग्रजांनी त्यांची सुटका केली नाही. देशाच्या स्वातंत्र्यासाठी दुःख हालअपेष्टा, कारावास हे सारे मौलाना आझादांनी सहन केले.

इ. स. १९४० पासून १९४६ पर्यंतच्या काळात मौलाना आझाद हे काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी ही जवाबदारी चांगल्या रीतीने पार पाडली.

त्याचप्रमाणे हिंदू, मुसलमान यांच्या एकीसाठी ते आयुष्यभर झटले. स्वातंत्र्यांची चळवळ यशस्वी झाली, आपला देश स्वतंत्र झाला, स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री होण्याचा मान मौलाना आझादांना मिळाला.

### शब्दार्थ

**सभागृह** सभा घेण्याची खोली, **व्यासपीठ** भाषण देण्यासाठी तयार केलेली जागा. **लठ्ठ** जाड, **कुतूहल** आश्चर्य, **तुरुंग** कारावास, **हालअपेष्टा** कष्ट

## वाक्प्रचार

**थक्क होणे** आश्चर्यचकीत होणे

**भाकीत करणे** भविष्याचा अंदाज करणे/सांगणे

**खांद्याला खांदा लावून काम करणे** बरोबरीने काम करणे

**निक्षून सांगणे** ठामपणाने सांगणे

### टीप

**संपादक :** एखाद्या विषया वरील लेखन एकत्र करणारी व्यक्ती

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :

१. लोक कोणाला पाहण्यासाठी उत्सुक झाले होते ?

२. पंडीत नेहरूंनी मौलाना कलाम आझाद यांच्या बद्दल कोणते उद्गार काढले होते ?

३. गांधीजीनी इंग्रजानां निक्षून काय संगितले ?

४. मौलाना अबुल कलाम आझाद आयुष्यभर कशासाठी झटले ?

### २. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

१. अबुल कलाम आझाद यांनी लहान वयात कोणती मोठी कामगिरी केली होती ?

२. अबुल कलाम आझाद यांनी कोणते वर्तमानपत्र काढले होते ?

३. लोकांनी केलेले कोणते भाकीत मौलाना आझाद यांनी खरे करून दाखविले ?

४. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मौलाना यांनीं कोणाकोणाबरोबर काम केले ?

५. मौलाना आझाद यांचे कार्य थोडक्यात वर्णन करून लिहा .

### ३. खालील शब्दांचा उपयोग करून वाक्य बनवा :

व्यासपीठ, संपादक, सभा, वर्तमानपत्र, भाषण

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

### ४. खालील वाक्ये क्रमाने लिहा :

१. परंतु सभेला सुखात झाली आणि काय आश्चर्य. ☐

२. लोक थक्क झाले. ☐

३. एवढ्यात एक कोवळा तरूण व्यासपीठावर आला आणि मुख्य खुर्चिवर बसला. ☐

४. तो तरूण भाषण करण्यासाठी उभा राहिला. ☐

५. त्यांनी आपल्या मुलाला खुर्चीवर बसु दिले असेल. ☐

## ५. रिकाम्या जागा भरा :

१. ............... सभागृहकडे लोकांची खूप गर्दी लोटली होती.
२. सभागृहात ............... सुरू झाली.
३. त्यांनी वयाच्या ............... वर्षी एक वर्तमानपत्र काढले.
४. इ. स. १९४० पासून १९४६ पर्यंतच्या काळात मौलाना आझाद हे ............... चे अध्यक्ष होते.
५. स्वतंत्र भारताचे पहिले ............... होण्याचा मान मौलाना आझादांना मिळाला.

## ६. धड्यातून ऱ्हस्व वेलांटीवाले शब्द शोधून लिहा :

## ७. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :

१.लठ्ठ ----- २.कुतूहल -----
३.कामगिरी------ ४.तुरुंगवास ----- ५.निक्षून ----- ६.गोष्ट -----

## ८. शब्दकोशाच्या क्रमप्रमाणे लिहा :

थक्क, उत्सुक, सभा, एवढ्यात, तरुण

(१)-----(२) ----- (३) ----- (४) ----- (५) -----

### प्रवृत्ती

**•. स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेल्या लोकांची नावे लिहा.**
**• स्वातंत्र्यसाठी लढणाऱ्या लोकांच्या हकीकती मिळवून त्या वाचा.**

# पुनरावर्तन - ३

## १. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यांत लिहा :

१. दिवाळीच्या सुट्टीमध्ये आई काय बनाविते ?

२. मोराच्या सोबत कोण नाचत आहेत ?

३. मुर्खांच्या यादीत पहिले नाव कोणाचे होते ?

४. मौलाना अबुल कलाम आझाद आयुष्यभर कशासाठी झटले ?

## २. खाली दिलेला परिच्छेद वाचून विचारलेल्या प्रश्नांची उतरे लिहा :

एका गरिबाच्या घरी एक बकरी होती. गरिबाचे घर असतेच केवढे ! लहानसे खोपटे असायचे. त्या लहानशा खुराड्याच स्वयंपाक व्हायचा, झोपायचेही तिथेच. दिवसा उन्हाच्या वेळी व पावसाळ्यात बकरीही आतच बांधायची आणि रात्री तिला कुणी चोरू नये म्हणून ती घरात हवीच.

त्या गरिबाच्या घरी स्वयंपाकासाठी चारदोन मातीची मडकी होती. एक दिवस काय झाले, एक लहान तोंडाचे वरवाचे मडके बकरीच्या खुंटीजवळ चुकून राहून गेले. बकरीला खमंग वास आला. काही खायला असेल असे समजून तिने त्यात तोंड खुपसले. पहिल्या पहिल्यांदा तोंड आत जाईना. पण ते मडके नेहमीच्या स्वयंपाकातले असल्याने त्याला आंतून शिजवलेल्या अन्नाचा खमंग वास होता त्या वासाच्या लोभाने कसेबसे करून त्या मडक्यात तिने मुंडके घातले खरे !

मडक्यात मुंडके गेले । परंतु तिथे काही नव्हतेच. आत तोंड अडकल्यांवर बकरीला श्वास घेणे जमेना. तिचा जीव गुदमरू लागला. घाबरून ती बेंऽऽ... बेंऽऽ... करून ओरडू लागली.

१. गरीबाच्या घरी काय होते ?

२. लहान तोंडाचे वरणाचे बखाचे मडके चुकून कुठे राहून गेले होते ?

३. बकरीने मडक्यात तोंड का खुपसले ?

४. बकरीचे तोंड मडक्यात अडकल्यावर काय झाले ?

## ३. उदाहरण प्रमाणे वेगवेगळ्या दोन शब्दांवरून एक वाक्य बनवा :

**उदाहरण : मोर : अंगण**

**मोर अंगणात नाचतो.**

१, शिक्षक, मधली सुट्टी २. मूर्ख - यादी ३. भारत, शिक्षण मंत्री

## ४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :

१.ढग------२.फायदा-----३.लठ्ठ ----- ४.बादशहा ------ ५.हिंमत--------

## ५. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :

१. मूर्ख----- २. पुर्ण----- ३. पहिले------

४. मोठी------ ५. आधी -----६. घेणे ------

## ६. खालील पत्र वाचा

सुनीता जाधव
१३.८.२०१३

सादर नमस्कार। आपण सगळे खुशाल असाल. आजी आता अगदी मजेत असेल. तुम्हाला सगळ्यांना मला खूप आनंदाची बातमी दयाची आहे. आमच्या इथल्या सर्व शाळेतल्या विद्यार्थींची भाषाणाची स्पर्धा होती. विषय होता. आपल्या गावासाठी आपण काय करू शकतो ? सर्व मिळून एकंदर ४२ मुले व मुली होत्या. या भाषण स्पर्धेत मला पहिले बक्षिस मिळाले. एक ढाल व अनेक प्रमाणपत्रे मिळाली. सर्वांना माझे विचार खूप आवडले व मी खरोखर तसे करण्याचा प्रयत्न करणार आहे. मला तुमची सगळ्यांची खूप आठवण येते. बाकी सर्व गप्पा मी रविवारी घरी आल्यावर करूया.

आपली.

दिलेल पत्र कोणत्या गावाहून लिहिले असेल त्या विषयी कल्पना करून पत्राची तारीख, पत्ता, इत्यादी अर्धवट माहिती पूर्ण करा.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

## ७. खाली काही वाकप्रचार दिलेल आहेत आणि त्याचा अर्थ दिलेला आहे जो अर्थ बरोबर असेल. तो शोधून वाकप्रचारा समोरच्या कंसात त्याचा नंबर लिहा :

| | | |
|---|---|---|
| १. सिद्ध करणे | ☐ | बरोबरीने काम करणे |
| २. वेळ वाया घालविणे | ☐ | ठामपणे सांगणे |
| ३. थक्क होणे | ☐ | खरे करून दाखविणे |
| ४. निक्षून सांगणे | ☐ | आश्चर्यचकित होणे |
| ५. खांद्याला खांदा लावून काम करणे | ☐ | वेळ फुकट घालविणे |

- बाळमित्रांनो, शरीराचे भाग म्हणजे डोके. पोट, नाक, इत्यादी संबंधित वाकप्रचार वापरले जातात. शिक्षकांच्या मदतीने त्यांची यादी बनवा आणि अर्थ समजून घ्या

१. ---------------------- : ----------------------
२. ---------------------- : ----------------------
३. ---------------------- : ----------------------
४. ---------------------- : ----------------------
५. ---------------------- : ----------------------

## ८. कौंसातून योग्य प्रत्यय लावून रिकाम्या जागा भरा :

(कडे, च्या, चि, चे ने)

१. दरम्यान घोड्यां ------- एक व्यापारी जातिवंत उत्तम घोडे घेऊन बादशहाकडे आला.

२. बिरबल -------- मूर्खांची यादी तयार करण्याचे काम पूर्ण केले होते.

३. दिवाळी ------- सुट्टी लागली.

४. आमच्या गावात एक मोठे वडा ------- झाड आहे.

५. लाहोरच्या सभागृह ------- लोकांची खूप गर्दी लोटली होती.

● **खालील चुटका वाचा .**

बाबा : (पिन्टूला) पिन्टु तू येथे अंगणात खड्डा का खणत आहेस ?

पिन्टु : बाबा, पहा मी हे गुलाबाचे रोपटे लावत आहे.

बाबा : तुझ्या दुसऱ्या हातात काय आहे ? पाहू जरा.

पिन्टु : (हात दाखवून) बाबा ही जांभळाची बी, पण रोपच्या बरोबर मी लावणार आहे.

बाबा : (हसत) अरे. असे कसे होऊ शकते ?

पिन्टु : हो बाबा, इथे हे दोन्ही बरोबर मोठे होतील मग बघा गुलाबजांबू खायची कशी मजा येईल

●

# १२. संत बसवेश्वर आणि चोर

-अशोक मेनकुदळे



बाराव्या शतकात मंगळवेढा नावाचे राज्य होते. बसवेश्वर हे या राज्याचे महामंत्री होते.


एक मध्यरात्री महामंत्री बसवेश्वर आपल्या महालातील शयनकक्षात् निद्रेत होते. तोच महामंत्री बसवेश्वर यांची पत्नी. नीलांबिका अचानक ओरडू लागली. ''धावा, पकडा, चोरऽ चोरऽऽ माझा रत्नजडीत हार गळ्यातून काढून नेला ! पहारेकऱ्यांनो बघता काय, धावापकडा त्या चोराला.''

पहारेकरी धावले, थोड्याच वेळात महालातील सैनिकांनी चोराला पकडून बसवेश्वरांसमोर उभे केले.

चोर मुंडासे सावरत, भीतीने थरथरत, पाया पडून गयावया करू लागला, ''महाराज ! चुलको मी. मी चोर नाही. मला क्षमा करावी महाराज.''

शिपाई म्हणाला : चोरी केलीस, तरी चोर नाही म्हणतोस ? याला माझ्या ताब्यात द्या महाराज ! सुतासारखा सरळ करतो. चोर तो चोर पुन्हा शिरजोर !

बसवेश्वर : तू आत कसा आलास ?



चोर : पहारेकऱ्यांचा डोळा चुकवून मी महालात आलो, महाराज,

नीलांबिका : धडधाकट दिसतोस. कष्ट करायचे जीवावर येते, म्हणून तू असल्या चोऱ्या करतोस का ? महामंत्र्याच्या घरी चोरी करांयची भीती कशी वाटली नाही तुला ?

चोर : "भीती वाटली, माते ! परंतु दोन दिवसांपासून काहीही न खाल्लेली माझी लेकर मला दिसत होती. उपाशी बायकोचा हिरमुसला चेहरा आठवत होता. याला मीच दोषी आहे. आई, मला माफ करा. जीवनदान द्या."

बसवेश्वर : काय काम करतोस तू ?

चोर : महाराज, माझ्याजवळ थोडीशी जमीन आहे. कोरडवाहू, परंतु या वर्षीच्या दुष्काळात काही पिकलं नाही. चाऱ्याबिगर माझा एक बैलही मेला, शेतीतरी कशी करू ? पोटाला चिमटा घेऊन कणीकोंडा चारून, आंबिल, पेज पाजून कसंतरी मुलांना जगवत आहे, मायबाप सरकार ! रोज सकाळ संध्याकाळ देवळात जाऊन शिवलिंगाची पूजा, अभिषेक करतो. मेली पोटाची भूक, जगूही देत नाही अन् मरूही देत नाही. याच विचारात काल आपल्या महालासमोरून जात होती. बाईसाहेबांना पूजेला जाताना पाहिलं. हातात, गळ्यात दागिने चमचमत होते. मनात विचार पक्का झाला. आज रात्रीची चोरी याच महालात करायची. नजरेसमोर भुकेनं तडफडत असलेली लेकरं दिसत होती. भीती कशी पळून गेली, परंतु मी अट्टल चोर नाही हो महाराज !

बसवेश्वर : नाव काय तुझं ?

चोर : रामण्णा आहे महाराज.

बसवेश्वर : दोरखंडातून त्याला मुक्त करा रे. नीलांबिके, तुझ्या अंगावरील दागिने काढ. (नीलांबिका हळूहळू दागिने काढून मंचकावर ठेवू लागते).

नीलांबिके आपल्या मंगळवेढा राज्यतील, प्रजाजनांना दोन वेळचे भोजन मिळालेच पाहिजे. कुणीही उपाशी राहता कामा नये. प्रत्येकाला या जगात जगण्याचा अधिकार आहे आणि प्रजेला जगवणे हे आपलं कर्तव्यच आहे. (चोराच्या खाद्यावर बसवेश्वरांनी अभयाचा हात ठेवताच चोराचे डोळे अत्यानंदाने डबडबले.)

"नीलांबिके, तुझ्या हव्यासामुळे हे दागिने आले, गरिबी आणि भूक याने त्रस्त झालेल्या रामाण्णाला हे दागिने दिसले आणि त्याच्या मनात चोरीचा मोह झाला. (आपल्या गरजेपेक्षा जास्त संपत्ती साठवणे, हे योग्य नाही. प्रथम आपणच गुन्हेगार आहोत. लोभी वृत्तीमुळे कुणाचे ना कुणाचेतरी शोषण होत असते. अति संग्रह पाप आहे, म्हणून तुझ्या अंगावरचे दागिने त्याला देऊन टाक."

"अरे रामण्णा, तू सकाळ-संध्याकळ शिवमंदिरात बसून पूजा करतोस, पाच-सहा तास पूजेत घालवतोस, तर मग तुझ्या शेतीवाडीची कामे कोण करतो ? अरे, बाबा, असे वागू नकोस. मंदिरात जाऊनच पूजा करता येते असे नाही. आपण काम करत असलेल्या ठिकाणी पूजा होते. स्वतःच्या शेतात मेहनत करणे, हीसुद्धा एक पूजाच आहे. स्वतःच्या शेतात कष्ट कर, ज्यामुळे स्वतःचे व कुटुंबाचे पोट भरेल. असा व्यवसाय अत्यंत महत्त्वाचा आहे, तो केल्यानेच माणूस सुखी होतो. हे दागिने तुझ्याचकडे असू देत यातून मिळणाऱ्या पैशातून एक चांगला बैल घेऊन शेती कर."

चोर : (महात्मा बसवेश्वरांचे पाय धरत) माफ करा महाराज. आता मला माझी चूक लक्षात आली. यापुढे मी माझ्या शेतात भरपूर कष्ट करीन. धान्य पिकवीन, पण चोरी कधीच करणार नाही. (दयाळू अंतःकरणाने महात्मा बसवेश्व चोराला सोडून देतात.)

## शब्दार्थ

**शयनकक्ष** झोपण्याची खोली **निद्रा** झोप, **पहारेकरी** पहारा देणारे, **हिरमुसला** उदास, **कोरडवाहू** कोरडी, **अट्टल** पक्का, **मुंडासे** डोक्याला बांधण्याचा फेटा, **हव्यास** लोभ, **कष्ट** महेनत

## वाक्प्रचार

**भीतीने थरथरणे** खूप घाबरणे

**गयावया करणे** विनवणी करणे

**सुतासारखे सरळ करणे** शिक्षा करून एखाद्यामधिल दोष काढून टाकणे

**जीवावर येणे** नको नकोसे वाटणे

**जीवदान देणे** जिवंत सोडणे

**पोटाला चिमटा घेणे** उपासमार होणे

## टीप

**बसवेश्वर :** संत नसवेश्वर है कर्नाटकातील थोर संत होते. समाजातील वाईट चालीरीती जातीभेद नाहीशा करण्यासाठी त्यांनी खुप प्रयत्न केले. कन्नड भाषेत त्यांचा हा उपदेश (वचने) प्रसिद्ध आहेत.

**आंबिल :** ज्वारी किंवा नाचणीचे पीठ व ताक यांपासून बनवलेले एक पेय.

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :**

१. बसवेश्वर कोणत्या राज्याचे महामंत्री होते ?
२. बसवेश्वर यांच्या पत्नीचे नाव काय होते ?
३. बसवेश्वर यांची पत्नी अचानक का ओरडू लागली ?
४. चोराचे नाव काय होते ?
५. बसवेश्वरांच्या सांगण्यानुसार कोणता व्यवसाय सर्वात महत्त्वाचा आहे ?

**२. खालील प्रश्नांची उत्तरे तीन चार वाक्यात लिहा :**

१. रामण्णाच्या मनात चोरीचा विचार का आला ?
२. बसवेश्वरांनी महामंत्र्यांचे कोणते कर्तव्य सांगितले आहे ?
३) बसवेश्वरांच्या मते गुन्हेगार कोण ?
४) माणूस कशामुळे सुखी होतो ?

**३. पाठाच्या आधारे संत बसवेश्वर योग्या विषयी पांच सहा वाक्ये लिहा :**

**४. दिलेल्या सूचनेप्रमाणे लिहा :**

१) जोड्या जुळवा :

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| भीतीने थरथरणे | विनवणी करणे |
| गयावया करणे | नको नकोसे वाटणे |
| सुता सारखे सरळ करणे | खूप घाबरणे |
| जीवावर येणे | शिक्षा करून एखाद्यामधिल दोष काढणे |
| डोळा चुकवणे | उपसमार होणे |
| जीवदान देणे | दृष्टीस न पडव्याची काळाजी घेणे |
| पोटाला चिमटा घेणे | जिवंत सोडणे |

२) दिलेल्या उदाहरणाप्रमाणे शब्द तयार करा :

उदाहरण : राम – रामेश्वर

विश्व ----- विघ्न -----गरुड -----सर्व -----

३. उदाहरण : चोरी – चोऱ्या

सैनिक ---- देश ---- लेकरू ---- दागिने ---- राजा ---- चूक -----

४. खालील शब्द सारखे शब्द शोधून लिहा :

उदाहरण : कणीकोंडा

------ ------ ------ -------

५–आपल्याला आवडत असलेली

६. खालील शब्दाचे समानार्थी शब्द लिहा :

निद्रा = ---- पत्नी =---- पहारेकरी =----

क्षमा =---- लेकरे =---- भीती= ----

७. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :

रात्र X---- दुष्काळ X---- सकाळ X----

पाप X---- सुख X---- गरिबी X----

८. योग्य शब्दासमोर ☑ करा

परंतु ☐ कुटुमब ☐ मुक्त ☐

परन्तु ☐ कुटुंब ☐ मुक्त ☐

परनतु ☐ कुटुम्ब ☐ मुक्त ☐

९. शब्दकोशाच्या क्रमाप्रमाणे लिहा :

चोरी, चूक, चेहरा, चारा चिमटा, चमचम, चांगला

(१)-----(२) ----- (३) ----- (४) ----- (५) -----(६) ------

**प्रवृत्ती**

**तुमच्या शिक्षकांकडून आणखी अशा प्रजावत्सल राजाची माहिती मिळवा.**

# १३. पाखरांशी मैत्री



**भा. दो. पाटील**

"अमोल, काय करतोस रे बागेत, संपलं नाही का तुझे दात घासणं, चल लवकर आत ये. तोंड धू अन् दूध पी." चार वेळा आईचं बोलावणं आलं, पण अमोल घरात शिरला नव्हता.

गेल्या चार दिवसापासून अमोलचं सकाळी सकाळी बागेत रमणं सुरू होत. रोज सकाळी अमोल ब्रश घेऊन बागेत दात घाशीत असे. फुलांकडे पाहण्याअचा त्याला छंदच होता.



झाडावरच्या पक्ष्यांकडेही तो मोठ्या कुतुहलाने पाहत असे. कावळे, चिमण्या आणि एक भारद्वाज त्याच्या परिचयाचे झाले होते. पण अलीकडे एक वेगळाच पक्षी बागेत आलेला होता.

चिमणीपेक्षा मोठा पण कावळ्यापेक्षा लहान पक्षी मोठा सुरेख होता. (त्याच्या डोक्यावर तुरा होता. रंगीबेरंगी पंखावर नक्षी होती. बाकदार चोंच आणि ऐटदार शेपटीनं हे पाखरू मोठे डौलदार वाटत होते. पाणीदार डोळे फिरवीत हे पाखरू सारखं इकडून तिकडे फांद्या फांद्यावरून फिरत असे. या छोट्य पक्ष्याकडे पाहण्याचा छंदच अमोलला लागला होता. या पाखराचं जणू त्याला वेडच लागलं होतं. रोज सकाळी पक्षी बागेत येत असे. तास दोन तास बागेत रमून ते नाहीसे होत असे, मग मात्र ते कधीही बागेत दिसत नसे.

अमोलला पक्षी फारच आवडला होता. त्यानं दिवसभर आपल्याच बागेत राहवं असं अमोलला वाटत होतं. दिवसभर पक्ष्यांच नाहीसं होणं त्याला आवडत नव्हतं. या पक्ष्यांनं इथंच राहवं यासाठी अमोलचा खटाटोप सुरू झाला. तहेतहेचा खाऊ अन फळं त्यांनं बागेत ठेवावयास सुरुवात केली. पण देखण्या पक्ष्यानं कशावरच चोच मारली नाही. त्याचं झाडावरचं अचपळ हिंडणं चालुच होतं. कधी कधी बागेतल्या जमिनीवर तुरुतुरु चालणंही चालूच असे. यावेळी अमोलला या पक्ष्याला पकडण्याचा मोह होत असे. दबक्या पावलानं तो पक्षी पकडण्याचा खटाटोप करीत असे. पण पक्षी क्षणात गिरकी घेऊन झाडावर तर कधी आभाळात निघून जात असे.

अमोलला पक्ष्याचं वेडच लागलं होतं. हा पक्षी आपल्या जवळ कायम हवा हा विचार बळावत गेला. त्या विचारामुळं पक्षी पकडण्याचाच विचार त्याच्या मनात लागला. त्या दिशेने त्याचा खटाटोप सुरु झाला.

त्यानं एक टोपली घेतली. त्या टोपलीला काडीचा आधार दिला, टोपलीखाली धान्य पसरलं काडीला दोरी बाधून ती दोरी त्यानं घरात नेली. पक्षी टोपलीखाली आला की तो दोरी ओढणार होता. पक्षी टोपलीखाली कोंडला जाईल ही त्याची अटकळ होती.

अमोलची ही धडपड आईनं पाहिली. आईनं दटावीत म्हटलं "अमोल, कशाला रे त्यां चिमण्या पकडतोस ? त्यागरीब बिचाऱ्या चिमण्यांनी काय केलयं तुझं ? पक्ष्यांवर प्रेम करायचं हे शाळेत शिकवतात ना रे ?"

"अग आई, मी चिमण्यांना पकडत नाही. मला हवाय तो सुंदर पक्षी. मी त्याला पिंजऱ्यात ठेवणार आहे, त्याला चांगलं चांगलं खायला देणार आहे. त्याची चांगली काळजी घेणार आहे."

"अरे वेड्या पक्षी बाहेरच आनंदी असतात मिळेल ते खातात आणि आनंदानं जगतात. पिंजऱ्यात कितीही चांगलं खायला मिळालं तरी ते दुःखीच असतात. तुला असं कोंडलं तर आवडेल का तुला ?"

अमोलला आईचं म्हणणं फारसं पटलं नाही. पण शाळेची वेळ झाल्यामुळं त्याचा खटाटोप थांबला.

अमोल दिवसभर पक्षी पकडण्याचा विचार करीत होता. पक्षी पकडला की त्याला पिंजऱ्यात ठेवायचं. मित्रांना तो पक्षी दाखवायचा. पोपटापेक्षाही सुंदर पक्षी अमोलजवळ आहे हे सगळ्यांना कळलं की जो तो आपलं कौतुक करील याविचारानं अमोल सुखावत होता. पण मध्येच त्याला आईचे शब्द आठवत.... "तुला असं कोंडलं तर...."

रात्री नऊ वाजता अमोल झोपी गेला. गाढ झोपेत त्याला स्वप्न पडलं. फार मोठ्या झाडाला फार मोठा पिंजरा बांधलेला होता. पिंजरा मोठा देखणां होता. रंगीबेरंगी होता. पिंजऱ्यात सुरेख पलंग होता. त्या पलंगावर मऊ मऊ

गादी अंथरलेली होती. बाजूला छोटा टेबल, छोटीशी खुर्ची होती. छोटासा पंखा पण होता. चकचकीत पाण्याचे पिंप होते. टेबलावर तेऱ्हेतऱ्हेचे पदार्थ होते. फळे होती. पिंजऱ्यात एक छोटासा झोपाळा पण होता. पिंजऱ्यात सगळं काही होतं पण पिंजऱ्याचं दार बंद होतं.

स्वप्नातल्या झोपेत अमोल जागा झाला. तो पलंगावरून ताडकन खाली उतरला. त्यानं फळांकडे पाहिले नाही. पदार्थ पाहिले नाहीत. तो पिंजऱ्याच्या बाहेर पडण्यासाठी धडपडू लागला. पण पिंजऱ्याचं दार बंद होतं. पिंजऱ्याच्या दाराला चकचकीत बंद कुलूप होत.

अमोल चिडला. रागावला. तो जोरजोरात ओरडू लागला. "दार उघडा दार. मला कोणी कोंडलंय. ए आई ये, लवकर ये."

अमोलच्या ओरडण्यानं सारा परिसर दणाणला. झाडावरचे पक्षी पंख फडकवीत पिंजऱ्याभोवती घिरट्या घालू लागले. त्यात अमोलच्या बागेतील तो सुंदर पक्षी पण होता. तो पक्षी अमोलला म्हणला. "भाऊ, कशाला ओरडतोस, हा पिंजरा किती छान आहे. आत चांगली व्यवस्था आहे. चांगले चांगले खायला पण आहे. प्यायला पाणी आहे. खा आणि पाणी पी. हवं तर झोपळ्यावर झोका घे. आणखी काय हवंय तुला."

अमोलला आईची आठवण आली. तो ओरडला "मला काही नकोय. माझी आई कुठाय ?"

पिंजऱ्याबाहेर एक सुंदर परी आली. ती म्हणाली, "अमोल, इथं आई नाही तुझी. पण मी आहे ना. बघ बघ मी तुझ्या आईपेक्षा सुंदर आहे. मी तुझा चांगला सांभाळ करीन. तू मला आवडलास. तू कायम माझ्याजवळ राहावास म्हणून मी तुला पकडून पिंजऱ्यात ठेवलंय. तुम्ही पक्ष्यांना ठेवतात तसं. आता ओरडू नकोस. आनंदात राहा बाळा."

अमोल जोरात ओरडला, "नाही. नाही. मला हे काहीही नको. सोडा मला सोडा. बाहेर सोडा."

अमोलचं स्वप्न संपलं. अमोल ताडकन उठून बसला. आईनं अमोलला विचारलं "काय अमोल स्वप्न पाहात होता की काय ? काय रे पाहिलं स्वप्नात ?"

अमोल आईला बिलगला व म्हणाला, "आई, मी पक्षी पकडणार नाही. त्यांना पिंजऱ्यात कोंडणार नाही. पाखरांचा खरा मित्र होईनं."

"शहाणं बाळ माझं," म्हणत आईने अमोलचा मुका घेतला.

## शब्दार्थ

**कुतुहल** उत्सुकता, **अचपळ** सारखे फिरत असणारे, स्थिर नसणारे

## वाक्प्रचार

**गिरीक घेणे** स्वतः भोवती गोल फिरणे

**विचार बळावणे** एखादा विचार पक्का होणे.

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :

१. अमोलला आईने कितीवेळा हाक मारली ?
२. अमोल कोणाकडे कुतुहलाने पाहात होता ?
३. अमोलला कोणाचे वेड लागले होते ?
४. अमोल आईला बिलगून काय म्हणाला ?

### २. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

१. झाडावरचा पक्षी कसा होता ?
२. अमोलने पक्षी कसा पकडायचा ठरविले होते ?
३. अमोलला झोपेत कसले स्वप्न पडले ?
४. अमोल ओरडल्यावर पक्षी काय म्हणाला ?

### ३. पक्षी आणि अमोल एकमेकांशी काय बोलले असतील ? याविषयी पाच वाक्ये लिहा.

### ४. दिलेल्या सूचनेप्रमाणे लिहा :

(१) खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे शब्द तयार करा :

**उदाहरण :**

| | |
|---|---|
| चिमणी – चिमणा | मोर – लांडोर, |
| ..........–कावळा | गाय –.......... |
| म्हैस –........... | मेंढी–.......... |

(२) अमोल, कशाला रे त्या चिमण्या पकडतोस?

| | |
|---|---|
| ● एक पक्षी उडत आला | ● अनेक पक्षी ----------- |
| ● पक्षाने फळ खाल्ले | ● पक्ष्यांनी फळे ---------- |
| ● त्याने एक टोपली घेतली | ● त्याने खूप टोपल्या ------- |

(३) कंसातील योग्य तो प्रत्यय घालून खालील रिकाम्या जागा भरा :

(चे, चा, च्या)

१. चार वेळा आई .............बोलावणे आले.
२. यावेळी अमोलला या पक्ष्याला पकडण्या ................मोह होत असे.
३. तो पिंजऱ्या ................बाहेर पडण्यासाठी धडपडू लागला.
४. ‘‘शहाणा बाळ माझं म्हणत आईने अमोल................ मुका घेतला.’’
५. अमोल ................ओरडण्यानं सारा परिसर दणाणला.

**५.समानार्थी शब्द शोधून त्याच्या जोड्या लावा :**

झाड    दिवस    फुले    डोळे    पाणी    आभाळ

सुमन    दिन    नयन    वृक्ष    नभ    नीर

**६. खाली दिलेल्या गोष्टीच्या रेघा मारलेले शब्द उलट सुलट झाडे आहेत. योग्य जागेवर योग्य शब्द घालून ती गोष्ट पुन्हा लिहा.**

एक होता मोर

एक कावळा नव्हता. त्याला स्वतःचा रंग आवडत होता की रूप ही आवडत होता. त्यामुळे तो नेहमी उदास राहत नसे. घरट्यात आला तरी कावळी बरोबर बोलत काय. कावळीला वाटत असे, हया माझ्या कावळ्याला झाले आहे तरी नसे ? एके दिवशी हा कावळा आपला पिसारा फुलवून नाचत होता. उडत उडत जंगलात पोचला. तिथे एका झाडाच्या फांदीवर काही पिसे पडलेली होती. त्यां झाडाखाली थोड्या वेळापूर्वीच एक मोर फांदीवर आराम करण्यास बसला. कावळ्याच्या मनात विचार आला, ''ही पिसे लावून मी मोर झालो, तर किती छान होईल.''

**७. खालील शब्द शब्दकोशाच्या क्रमाने लिहा :**

अमोल, रंगीबेरंगी, पाखरू, वेड, पिंजरा

(१)-----    (२) -----    (३) -----    (४) -----    (५) -----

**प्रवृत्ती**

**तुमच्या आसपास असलेल्या झाडांची माहिती मिळवा. झाडांचे काय काय उपयोग होतात ते शोधून त्याविषयी विचार मांड.**

●

# १४. भारत माता

शांता शेळके



प्रियतम अमुची भारतमाता
आम्ही सारी तिची मुले

रंग वेगळे,ग्रंथ वेगळे
तरी येथली सर्व फुले !

प्रिय आम्हांला येथिल माती
प्रिय हे पाणी झुकझुळते
प्रियकर ही डुलणारी शेते
प्रिय हे वारे सळसळते !



प्रियतम अमुचा धवळ हिमाचल
बघे भिडाया जो गगना
प्रिय तम अमुचे सह्यविंध्य हे
प्रिय तमा या गंगा-यमुना !

मानव सारे समान असती
शिकवण ही जगतास दिली
या मातेची मुले सद्‌गुणी
सर्व जगाला प्रिय झाली !

प्रियतम अमुची भारतमाता
वंदन आम्ही तिला करू
या मातेची मुले लाडकी
सदा तिया ध्वज ऊंच धरू !

## शब्दार्थ

**प्रियतम** अतिशय प्रिय, **गंध** वास, **धवल** पांढरा, **भिडणे** टेकणे, **गगन** आकाश, **सदगुणी** चांगले गुण असलेली, **हिमाचल** हिमालय, **वंदन** नमस्कार, **सदा** नेहमी

## टीप

**सह्य विंध्य** महाराष्ट्रातील पर्वतांची नावे

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१. मुलांना भारतमाता कशी वाटते ?

२. मुलांना भारतातील काय काय प्रिय आहे ?

३. भारताने जगास कोणती शिकवण दिली ?

४. भारतमातेची सर्व मुले कशी आहेत ?

५. भारतमातेसाठी सर्व मुले काय करणार आहेत ?

**२. उदाहरणानुसार शब्दांचा वाक्यात उपयोग करा.**

**उदाहरण : भारत**

**वाक्य :** भारत आमचा देश आहे.

१. माती : -----------------------------------------

२. हिमालय : --------------------------------------

३. गगन : -----------------------------------------

४. वंदन : -----------------------------------------

**३. उदाहरणाप्रमाणे लिहा :**

उदाहरण : फुल – फुले

- फुगा –.........
- माकड –.........
- .........–आरसे
- .........– नद्याया
- टोपी –.........
- चिमणी –.........
- .........– पेटया
- कावळे –.........

**४. खालील दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

स्वदेश X-------- सुगंध X--------- प्रिय X---------

**५. खाली दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा :**

मानव सारे.............................................................................

.........................................................................................

.........................................................................................

..............................................................................प्रिय झाली ।

## ६. खालील वाक्ये योग्य क्रमाने लिहा :

**उदाहरण : ध्वज ठेवणार, भारताचा उंच .**
**भारताचा ध्वज उंच ठेवणार.**

१. भारत आहेत मुले मातेचे सारे आम्ही.

..........................................................................................

२. पर्वत उंच हिमालय आहे.

..........................................................................................

३. प्रिय देश माझा मला आहे.

..........................................................................................

## ७. देशाची सेवा करण्यासाठी तुम्ही काय काय करु शकाल, त्याविषयी सात-आठ वाक्ये लिहा :

### प्रवृत्ती

- राष्ट्रध्वजाचे चित्र काढून त्यात रंग भरा.
- ग्रंथालयातून देशप्रेमाची गीते मिळवून ती वर्गात प्रस्तुत करा.
-

# १५. सत्याची ताकद

सुधा मूर्ति

खूप वर्षापूर्वीची गोष्टी आहे. गांधार देशात विद्याधर नावाचा एक राजा राहत होता. तो एक कुशल राज्यकर्ता तर होता पण त्याबरोबर तो अत्यंत कनवाळू स्वभावाचा होता. त्याचे प्रजाजन अत्यंत समाधानी होते. पण राजाला मूळबाळ नव्हतं. त्यामुळे त्याच्यानंतर या राज्याचा वारसदार कोण, असा प्रश्न सर्वांच्याच मनात उपस्थित होत असे.

राजाला बागकामाचा छंद होता. आपल्या फावल्या वेळात त्याने सुंदर बाग फुलवली होती, विविध प्रकारची रोपं लावली होती. आपल्या झाडांची निगराणी तो इतक्या मायेने करी, की जणूकाही ती त्याची मुलंच असावीत. तो बाहेरच्या देशांमधून विविध प्रकारचे बी–बियाणं मागवून घेई आणि आपल्या बागेत विविध प्रयोग करी. पण तरीसुद्धा आपल्यानंतर राज्याला वारसदार कोण हा प्रश्न त्याच्या मनात घर करून राहिला होता.

असे कित्येक दिवस लोटले. एक दिवस अचानक राजाने जाहीर केलं, ''आज मी माझ्या राज्यातील सर्व लहान मुलांना बियाण्याचे वाटप करणार आहे. त्यानं त्यांना तीन महिन्यांचा अवधी देणार आहे. त्या मुलांनी ते



बीज एका कुंडीत पेरून त्या कालावधीत त्यांची उत्तम देखभाल करायची. ज्याच्या झाडाची उत्तम वाढ होऊन त्याला सर्वांत सुंदर फुलं येतील, तो या राज्याचा राजपुत्र बनेल."

त्या गावात पिंगळ्या नावाचा एक मुलगा राहत होत. त्यालाही राजाकडून बीज मिळालं होतं. तो एका शेतकऱ्याचा मुलगा होता, आणि त्याला बागकामाची खूप आनंद झाला. त्याने एका कुंडीत उत्तम प्रतीचि माती घालून त्यात ते बीज पेरलं. त्याला चांगलं खत आणून घातलं. तो रोज त्याला काळजीपूर्वक पाणी घालत असे. त्याची इतकी काळजी घेऊनसुद्धा काही आठवडे लोटले तरी त्या बीजाला कोंब फुटेना.

पिंगळ्या खूप बुद्धिमान आणि कष्टाळू, मुलगा होता. त्याला वाटलं, कदाचित कुंडी किंवा माती योग्य प्रकारची नसेल. मग त्याने कुंडी आणि माती बदलून पाहिली. तरीसुद्धा त्या बीजाला कोंब काही फुटला नाही.

अखेर निर्णयाचा दिवस उजाडला. राज्यातली सगळी मुले रंगीबेरंगी नवे कपडे घालून आपल्या पालकांबरोबर राजवाड्याच्या दिशेने निघाली होती. सर्वांच्या हातात सुंदर फुलांनी बहरलेल्या कुंड्या होत्या.

ते पाहून पिंगळ्या मनातून कष्टी झाला. आपल्याला त्यांच्याबरोबर जाता येत नाही. याचं त्याला फार वाईट वाटल होतं. ते पाहून त्याच्या वडिलांनाही वाईट वाटलं. ते म्हणाले. "बाळा, तु तुझ्या परीने जास्तीत जास्त प्रयत्न केलेस. तू सुद्धा तुझी कुंडी घे आणि राजालां नेऊन दाखव."

"पण पिताजी, माझी कुंडी तर रिकामी आहे"

"असू दे बाळा. तू प्रयत्नांमध्ये कुठेही कसूर केलेली नाहीस. तू राजाची आज्ञा तंतोतंत पाळली आहेस. तूझ्या बीजापासून रोपटं उगवले नाही यात तुझा काय दोष ? तू प्रयत्न केलेस ही गोष्ट सर्वांत महत्त्वांची आहे. त्याला काय फळ मिळालं, हे महत्त्वाचं नाही."

पिंगळ्यापण राजाच्या राजवाड्यसमोरील प्रांगणात जाऊन इतर मुलांप्रमाणे आपली कुंडी घेउन रांगेत उभा राहिला, त्याच्या हाताातील रिकामी कुंडी पाहून सर्वजण त्याला हसू लागले.

थोड्या वेळाने राजा बाहेर आला. एकेका मुलाच्या हातातील कुंडीचे परीक्षण करू लागला. सर्व मुलांच्या हातातील कुंड्या पानाफुंलांनी बहरलेल्या होत्या. सर्व मुले आणि त्यांचे पालक हात जोडून राजाचे स्वागत करत होते.त्यांचे चेहरे प्रफुल्लित होते. पण राजाचा चेहरा मात्र समाधानी नव्हता. त्याच्या चेहऱ्यावर विषादाची छटा पसरली होती.

या परीक्षेचा निकाल उत्तम लागण्याची सर्व आशा मावळलेली होती. राजा तसाच रांगेत उभ्या राहिलेल्या मुलांसमोरून पुढे पुढे जात राहिला. अखेर तो रांगेतील शेवटच्या मुलापाशी येऊन थांबला तो मुलगा म्हणजे पिंगळ्या.

"महाराज, मला क्षमा करा मी जिवापाड प्रयत्न करूनही त्यांना यश आलं नाही. माझं बीज अंकुरलंच नाही." असे म्हणून तो शरमेनं मान खाली घालून उभा राहिला. त्याच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले होते. तोंडातून धड शब्दही फुटत नव्हता.

"बाळा, या राज्याचा राजपुत्र आणि माझ्या गादीचा वारसदार तूच आहेस. मी सर्वांना ज्या बिया वाटल्या होत्या त्या मी आधी भाजून काढल्या होत्या. कोणते पालक सत्यप्रिय आहेत, कोणत्या मुलांवर त्याच्या पालकांनी उत्तम संस्कार केले आहेत, हेच मला पाहायतं होतं. मी भाजलेल्या बिया दिल्यानंतर बरेचसे पालक त्या बदलतील

आणि मला खूष करण्यासाठी पानाफुंलांनी बहरलेल्यां कुंड्या मला दाखवायला घेऊन येतील, याची मला खात्रीच होती. पण कोणत्या मुलावर त्याच्या मातापित्यांनी प्रमाणिकपणाचे संस्कार केले आहेत, ते मला पाहायचं होतं. कारण केवळ असा सुसंस्कारित मुलगाच माझ्या राज्याचा वारसदार होऊ शकतो."

खरोखर... पिंगळाला त्याच्या प्रमाणिकपणांच फार मोठं बक्षीस मिळाले.

## शब्दार्थ

**कुशल** निपूण, **कानवाळू** दयाळु, **प्रजाजन** लोक, **फावल्या** रिकाम्या, **निगरानी** देखभाल, **अवधी** वेळ, काळ, **कष्टाळू** कष्ट करणारा, **कष्टी** दुःखी, **तंतोतंत** – हुबेहुब, **प्रत** दर्जा, **उपस्थित** हजर, **प्रांगण** अंगण, **प्रफुल्लित** आनंदित, **अंकुरणे** बियाला पान फुटणे, **सुसंस्कार** चांगले संस्कार, **परीक्षण** एखादी गोष्ट तपासून पहाणे.

## टीप

**वारसदार** आपल्या पूर्वाजांचा वारसा पुढे चालविणारे.

## वाक्‌प्रचार

**मनात घर करणे** एखादी गोष्ठ मनात सतत असणे,

**जिवापाड प्रयत्न करणे** खपू महेनत करणे.

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :

१. गांधार देशात कोणता राजा राहत होता ?

२. राजाचा स्वभाव कसा होता ?

३. राजाला कसला छंद होता ?

४. पिंगळा कसा मुलगा होता ?

५. राजाने राज्याचा वारसदार कोणाला बनाविले ?

### २. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

१. राजाने काय जाहीर केले ?

२. राजाच्या चेहऱ्यावर विषाद का पसरला ?

३. पिंगळाच्या वडीलांनी पिंगळाला काय सांगितले ?

४. पिंगळाला राज्याचे वारसदार का बनविले ?

### ३. खालील वाक्ये पाठाच्या क्रमाने लिहा :

१. "पण पिताजी, माझी कुंडी तर रिकामी आहे."

२. पिंगळाला त्याच्या प्रमाणिकपणाचं फार मोठं बक्षीस मिळाले.

३. आज मी माझ्या राज्यातील सर्व लहान मुलांना बियाण्याचे वाटप करणार आहे.

१. ......................................................................................................

२. ......................................................................................................

३. ..........................................................................................

**४. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा :**

१. मनात घर करणे = ..........................................................

..........................................................................................

२. जिवापाड महेनत करणे = ..........................................................

..........................................................................................

**५. खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

प्रजाजन = -------- छंद = -------- बाग = --------

अवधी = -------- उपस्थित = -------- कोंब = --------

**६. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

सुंदर X ------- जन्म X ------- प्रकाश X -------

हसणे X ------- आशा X ------- यश X -------

**७. सूचनेनुसार लिहा :**

१. दिलेल्या शब्दाच्या शेवटच्या अक्षरावरून नवे शब्द बनवा

बाग– गवत तलवार

राजा –

वारसदार –

खूप –

बक्षीस –

२. कोणतेही पाच शब्द निवडून प्रत्येक शब्दावरून एक–एक वाक्य लिहा :

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**८. खालील शब्द शब्दकोशाच्या क्रमाने लिहा :**

गांधार, विद्याधर, राजा, आज, बागकाम.

(१)-----(२) ----- (३) ----- (४) ----- (५) -----

**प्रवृत्ती**

- **ग्रंथालयातून निरनिराळ्या राजांच्या कथा मिळवून वाचा.**

# पुनरावर्तन – ४

**१. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :**

१. बसवेश्वर यांच्या पत्नीचे नाव काय होते ?

२. अमोलला कोणाचे वेड लागले होते ?

३. भारताने जगास कोणती शिकवण दिली ?

४. राजाला कसता छंद होता ?

**२. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१. माणूस कशामुळे सुखी होतो ?

२. अमोलला झोपेत कसले स्वप्न पडले ?

**३. खालील प्रत्येका विषयी चार वाक्ये लिहा :**

१. बसवेश्वर यांचा दयाळूपणा (२) पिंगळाचा प्रमाणिकपणा (३) आमची भारत माता

**४. खऱ्या वाक्यासमोर ( ✔ ) आणि चुकीच्या वाक्यासमोर ( X ) अशी खूण करा.**

१. बसवेश्वर हे मंगलवेढा राज्याचे महाराज होते . ☐

२. अमोलला पक्षी बिलकुल आवडला नव्हता . ☐

३. मानव सारे समान असतात. ☐

४. पिंगळाला त्याच्या प्रमाणिकपणाचे बक्षिस मिळाले नाही. ☐

**५. पाठ्यपुस्तकातील पाठात येणारी नावे कोष्टकातून शोधून नावाभोवती ⬭ करा.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | रा | पिं | ग | ळा | शे | मं | न |
| नि | मो | म | न | दी | त | ग | स |
| लां | | ल | ण्णा | भा | क | ळा | वे |
| बि | वि | द्या | ध | र | री | वे | श्व |
| का | म | क | प | त | प | ढा | र |

**६. खालील वाक्प्रचारांचा उपयोग केंव्हा होतो ते लिहा :**

जिवावर येणे –

मनात घर करणे –

जिवापाड प्रयत्न करणे –

विचार बळावणे

अशी वाक्ये तयार करा :

(१) ........................................... (२). ...................................

(३) ............................................. (४)...................................

### ७. ग्रंथालयातून दोन बालकथा वाचून कोणत्यापण एका विषयी लिहा :

१. पुस्तकाचे नाव :....................................................

२. पुस्तकाचे लेखक :....................................................

३. पुस्तकात येणारी दोन पात्रे :...................... ..............................

### ८. कंसात दिलेल्या शब्दांत योग्य बदल करून रिकाम्या जागा भरा :

**उदाहरण :** राजाने छान बाग **फुलवली** होती . (फुलवणे)

१. त्याच्या मनात हा प्रश्न घर करून ........... (राहणे)

२. तुझी कुंडी घे आणि राजाला नेऊन .......... (दाखवणे)

३. सदा तिचा ध्वज उंच ........... (धरणे)

४. दबक्या पावलाने तो पक्षी पकडण्याचा खटाटोप ........... (करणे)

५. आई मुलाला चांगले चांगले खायला ........... (देणे)

# पूरकवाचन

## १. झाड

ल. म. कडू

एक पक्षी उडत आला
चोचीतले बी टाकून गेला
काळ्या ढगाने पाणी दिले
सूर्याने मग ऊन दिले ।

पोपटी कोवळा कोंब फुटला
भावंडांचा मेळा जमला
पाने झाली शंभर हजार
कावळा चिमणी आली घार ।

झाड झालं डेरेदार
मुलं जमली एक हजार
गोल गोल पडली सावली
मुलांच्या खेळाला रंगत आली ।

कुणी तिथे घरटी बांधली
मुले सारी गाऊ लागली
खंड्या मोर पक्षी हजार
आनंदाने आली बहार ।


झाडाल आली फळे फुले
झाडावर चढली सारी मुले
फळे खाल्ली ढीगभर
बिया पडल्या डोंगरभर

एक पक्ष्याने जादू केली
एक झाडाची हजार झाली
पक्षी, मुले शंभर हजार
रान झाले हिरवे गार ।

झाडाचा धर्म सावलीचा
फळे फुले सारं द्यायचा
म्हणून झाडावर पक्षी हजार
झाडाखाली मुले हजार ।

**शब्दार्थ**

**कोंब** जमिनीत रूजलेल्या बीला कोवळी पाने फुटणे
**डेरेभार** भरावदार
**सावली** पडछाया
**बहार** मजा
**ढीगभर** जास्तप्रमाणात, भरपूर



# २. जिद्द हीच दौलत

दिनकर देशपांडे

जयदेव दोन्ही हातांचे तळवे गालांवर टेकवून समोरच्या दालनात फुरंगटून एकटा बसला होता. आईच्या बोलण्याचा त्याला राग आला होता. आई नेहमी त्याला रागवत असे. ''आपण का लहान आहोत ? आठव्या वर्गात गेलोय, तरीही आई–बाबांचे रागावणे सुरूच ''

विचारात गर्क असलेल्या जयदेवचे लक्ष खोलीत चिवचिवाट करणाऱ्या चिमणा चिमणीकडे गेले. त्यांनी घरटे बांधण्याचे काम काढले होते. काही वेळातच चिमणी बाहेर गेली अन् गवताची एक काडी घेऊन आली.

जयदेवचे आजोबा जयकृपा हे स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचा चेहरा रुबाबदार होता. अक्कडबाज मिशा, पाणीदार डोळे, पाहातच राहावे असे व्यक्तिमत्त्व

१९४२ साल उजाडले. 'चले जाव'चा आदेश महात्मा गांधीनी ब्रिटिशांना दिला. देश जागा झाला. स्वातंत्र्यसाठी लोक प्राणांची बाजी लावू लागले. घरादारावर तुळशीपत्र ठेवू लागले. कुणाला क्षणाची उसंत नव्हती. स्वातंत्र्य चळवळ फोफावली, तसा ब्रिटिशांनी जुलूम वाढवला. गोळ्यांच्या फैरी झाडू लागल्या. स्वातंत्र्यवीर धारातीर्थी पडू लागले. कुणाला जन्मभरासाठी तुरुंगात डांबले. जेवढा अन्याय करता येईल तेवढा सुरु होता. उद्देश हाच, की स्वातंत्र्याची चळवळ थांबावी.

जयदेवचे आजोबा चळवळीचे नेते होते. त्यांच्या घरात क्रांतिकारकांची नेहमीच वर्दळ असायची. तिथे कट केला जाई. योजना आखल्या जात. त्याप्रमाणे अंमलबजावणी होई. अशाच एका प्रसंगी जयकृपा कामी आले. गोळीला बळी पडले.

जयदेवला आजोबांच्या कर्तृत्वाचा इतिहास आठवत होता. त्याचे बाबा जयकृष्ण त्याला तो इतिहास वारंवार सांगत. आईच्या तोंडूनही त्याने आजोबांचे कर्तृत्व ऐकले,गोष्टी ऐकून काय करायच ? आता तर आपण स्वतंत्र



आहोत ना ? स्वराज्य मिळालं आहे ना ?

जयदेवची वृत्ती धरसोडीची होती. कोणतेही काम तो नेटाने पूर्ण करत नव्हता. मध्येच सोडून देई, त्यामुळे एकाही कामात त्याला यश मिळत नव्हते. कधी कधी खेळात तो हिरीरीने भाग घेई. पण काही दिवसांतच त्याचे लक्ष त्यातून उडून जाई. मग तो अभ्यासांवर लक्ष केंद्रित करी. पण तेही काही दिवसच चाले. नंतर तो कागदाच्या, मातीच्या, आगपेट्यांच्या विविध वस्तू करण्यात स्वतःला हरवून टाकी. पण तेही थोडे दिवसच.

जयदेवला वाटायचे आपण वैमानिक व्हावे. विमान चालवावे. लगेच दुसरे मन त्याला ट्रक ड्रायव्हर करून टाकायचे. ट्रक ड्रायव्हरचा तो ट्रॅक्टर ड्रायव्हर होई. पण

त्यातल्या अपघातांची, संकटांची जाणीव होताचं तो म्हणायचा, 'आपण साधं प्रवासीच व्हावं. समजा, आपलं विमान कुठं कोसळलं, कोणी चाच्यांनी पळवून नेलं, ट्रक उलटला तर जीव जायचा, त्यापेक्षा मोठेपणी एखादी सुखाची नोकरी करू.'

आणि अशा धरसोड वृत्ती मुळेचत्याची आई अन् प्रसंगी बाबाही त्याला रागे भरत. ते उभयता म्हणायचे, "अरे, कोणत्याही एका गोष्टीचा पाठपुरावा कर. धरसोड वृत्तीनं तुझे भलं होणार नाही."

शाळेत वादविवाद स्पर्धा होती. त्यात जयदेवने नाव नोंदवले. आईबाबांकडून वादविवादासाठी चांगली टिपणे तयार करून घेतली. तयारीही सुरू केली. अन् कुठे माशी शिंकली, माहीत नाही. त्याने एकाएकी स्पर्धेमध्ये भाग न घेण्याचा निर्णय घेतला. आईला तो बोलूनही दाखवला.

जयदेवच्या या वृत्तीचा आईला राग येणे साहजिकच होते. तिने त्याची चांगली खरडपट्टी काढली. बाबा बाहेरून येताच त्यांच्या ही कानावर ही गोष्ट घालण्याचे तिने ठरवले. म्हणूनच जयदेव समोरच्या खोलीत येऊन दोन्ही हातांचे तळवे गालांवर टेकवून एकटक पाहात एकटाच बसला होता.

चिटुकल्या चिमणीचे घर बांधण्याचे कार्य अव्याहतपणे चालू होते.त्यात खंड पडत नव्हता. तेवढ्यात आई तिथे आली. चिमण्यांचा तो उद्योग पाहून तिला रागच आला. स्टुलावर चढून तिने फोटोमागे जमलेला काडीकचरा काढून बाहेर फेकला. शुऽऽक् करून चिमण्यांना हाकलून लावले.

आईची पाठ वळली अन् पुन्हा चिमणीने काड्या जमवण्याचा उद्योग सुरु केला. तीच जिद्द, तोच उत्साह, जराही खंड नाही.

जयदेव त्या चिमण्यांकडे पाहण्यात रंगला होता. त्याला नवल वाटत होते. कौतुक वाटत होते. काही वेळ गेला असेल, तोच जयदेवचे बाबा आत आले. आल्याआल्याच त्यांचे लक्ष चिमण्यांच्यां उद्योगाकडे गेले. ते पुटपुटले, "काय धटिंगण आहेत या चिमण्या ! माझ्या वडिलांना त्यावेळची ब्रिटिश सत्ता चळचळ कापत होती. त्यांचा केवढा दरार ! नाव घेतलं की थरकाप होई ! अन ह्या भित्रट चिमण्या चक्क त्यांच्या फोटोमागं घरटं बांधतात, म्हणजे कमाल आहे !"

"अहो भित्रट माणसं शूरांच्या आधारानं राहात असतात," जयदेवची आई तेथे येत बोलली. बाबांनी तोपर्यंत त्यां फोटोमागील काडीकचरा बाहेर काढला होता. आईने तो बाहेर नेऊन फेकला.

"आं ! काय जयदेव महाराज, कसल्या विचारात गढला आहात आपण ?" बाबांनी विचारले.

कचरा फेकून परत आलेली आई म्हणाली, "अहो, कोणत्याही कामात जिद्दच नाही त्याला. सगळी धरसोड वृत्ती."

या वेळेपर्यंत चिमणीने पुन्हा काडी आणून, फोटमागे घरटे बांधणे सुरू केले होते, पूर्वीच्याच जिद्दीने, पूर्वीच्याच उत्साहाने.

तिकडे पाहात ते कडाडले, "अरे, ती इवालीशी चिमणी बघ, पुन्हा पुन्हा जिद्दीनं घरटं उभारते आहे अन् तू ? खरं तर जिद्द हीच माणसाची दौलत आहे."

जयदेवच्या डोक्यात प्रकाश पडला. जिद्द हीच माणसाला मोठी करत असते. तीच खरी दौलत. जिद्दीमुळेच या चिमणीचे घरटे पूर्ण झाले आणि आई-बाबा हरले.

## शब्दार्थ

१. **व्यक्तिगत** एखाद्या व्यक्तिच्या रूप आणि ह्यांचा प्रभाव
**जुलूम** बळजबरी
**डांबणे** कोंडणे
**वर्दळ** येजा
**कर्तृत्व** कार्य
**धरसोड** एखादी गोष्ठ नक्की न करणे
**नेटाने** चिकिटीने
**हिरीरीने** उत्साहाने, पुढे होऊन
**उभयता** दोघेही
**वादविवाद** वेगवेगळे विचार मांडणे
**अव्याहत** सतत
**धटिंगण** मस्तीखोर
**दौलत** संपत्ती

## वाक्‌प्रचार

१. **फुरंगटून बसणे** रूसून बसणे
**दंग होणे** एखाद्या गोष्टीत रंगून जाणे.
**प्राणांची बाजी करणे** न थकता शेवटपर्यंत प्रयत्न करणे.
**तुळशीपत्र ठेवणे** एखादी गोष्ट सोडून देणे
**उसंत नसणे** वेळ न मिळणे
**कट करणे** एखाद्याला हरविण्यासाठी काय करायचे ते ठरविणे
**योजना आखणे** एखादी गोष्ठ नीट करण्यासाठी विचार करणे
**अमंलबजावणी करणे** कृती करणे
**कामी येणे** उपयोगी पडणे
**हरवून टाकणे** एखादे काम करतांना त्यात दंग होणे.
**पाठपुरावा करणे** सतत मागे लागले
**माशी शिंकणे** कामात अडथळा येणे
**एकटक पाहणे** सतत पाहणे
**थरकाप होणे** खूप भिती वाटणे

# ३. रमाबाई आंबेडकर

- कृ.प.देशपांडे, सौ. सुभदा देशपांडे

इसवी सन १९०७ चा डिसेंबर महिना. भायखण्याच्या मासळी बाजारात वेगळीच धामधूम चालली होती. मासळी विकणाऱ्या कोळिणींचा बाजार सुरू व्हायला अजून अवकाश होता. मग ही गडबड कसली ? या गडबडीत एक वेगळा उत्साह होता, कारण ती होती लगीनघीई. बाजाराच्या चबुतऱ्यावर लग्न लागणार होते. त्याच्या एक कोपऱ्यात वराचे वऱ्हाड आणि दुसऱ्या कोपऱ्यात वधूचे बिऱ्हाड.

नवरा मुलगा भिवा उर्फ भीमा, जेमतेम सोळा वर्षांचा आणि नवरी मुलगी भागीरथी उर्फ रमा अवघी सोळा वर्षांची. 'शुभमंगल सावधान' झाले आणि कु. भागीरथी उर्फ रमा भिकूजी धत्रे आता सौ. रमा भीमराव आंबेडकर बनून सासरी आली.

लग्न झाले आणि रमा मुंबईच्या लोअर परळ इथल्या. डबक चाळीत राहयला आली. रमेने शाळेचे तोंडही पाहिले नव्हते, पण जगाच्या शाळेने तिला खूप शहाणपण दिले होते. अकाली प्रौढत्व आलेली रमा नवीन वातावरणात रूळत होती. सगळ्यांना सांभाळून राहात होती. आत्याबाईंना आईच्या जागी मानून त्यांची सेवा करत होती. थोरला दीर आनंदा आणि जाऊ लक्ष्मी यांच्याशी आदबीने वागत होती. रामाजींची तर ती लाडकी सून होती... आणि भीमा... पण रमा भीमाच्या बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष देत होती. त्याच्या आवडी - निवडी जपत होती. मॅट्रिक झालेल्या भीमाला पुढे शिकायचे होते.त्याने खूपच शिकावे, आपल्या कुळाचे, जातीचे नाव उज्ज्वल करावे, समाजासाठी, देशासाठी आपल्या शिक्षणाचा उपयोग करावा, अशी त्याच्या आईची - भीमाबाईची इच्छा होती. वडीलही त्याच्या बाबतीत हीच स्वप्ने पाहात होती. बडोद्याच्या सयाजीराव महाराजांच्या मदतीने भीमराव उच्च शिक्षणासाठी परदेशात रवाना झाले. न्यूयॉर्कला गेल्यावर त्यांनी कोलंबिया विद्यापीठात एम. ए. ला प्रवेश घेतला आणि घरी पत्र लिहिले. रमाईने त्या पत्राची कितीतरी पारायणे केली त्यातला शब्दन्‌शब्द तिच्या नजरेसमोर होता.



**प्रिय रमा,**

मी इथं सुखरूप पोहोचलो. काळजी करू नकोस. माझं शिक्षण ही देवानं दिलेली देणगी आहे, असं मी मानतो. त्याचा फायदा आपल्या समाजाला, देशाला नक्कीच होईल, असा माझा विश्वास आहे.

रमा, मला माहीत आहे, तू खूप गरिबीत दिवस काढतेस. सगळ दुःख मनात ठेवून संसार करतेस. मला हे समजत का नाही, पण काय करू, शिक्षणाची महत्त्वाकांक्षा मोठं होण्याच स्वप्न मला चैन पडू देत नाही. माझं मन मला सतत सांगत असत, आपण जन्माला आलो त्या समाजाचं, आपल्या देशबांधवांचे आपल्यावर ऋण आहे, त्याची सव्याज फेड हे आपल कर्तव्य आहे. तू माझ्या कार्यात सहकार्य करशील ना ?

**तुझाच**
**भीमराव**

आणि रमाईने आपल्या मोडक्या भाषेत भीमरावांना मदत करण्याचे, पाठीशी राहण्याचे वचन देणारे पत्र लिहिले.

भीमराव मुंबईत परत आले आणि सुखाचा संसार सुरू झाला. त्यांना दोन मुले झाली भीमरावांचा ग्रंथसंग्रह वाढला होता. भीमरावांसाठी ग्रंथ म्हणजे घरातली मंडळी होती. त्यांना जागा पुरेना म्हटल्यावर रमाईने सुचवले, ''साहेब, मला वाटतं आपण एखादी मोठी जागा घ्यावी.''

''का बरं ? असं वाटायचं कारण ?''

''नाही, तुमच्या मित्रमंडळींनां जागा पुरत नाही. नवीन मित्र आले तर त्यांना कुठ ठेवणार ?''

भीमरावांना रमाईची ही कल्पना आवडली. रमाईने घराचे नाव ठेवले 'राजगृह.'

महाडचा 'चवदार तळया' चा लढा, 'राममंदिर प्रवेशाचा लढा' यात भीमराव गुंतले होते... अशातच इंग्रज सरकारने दुसरी गोलमेज परिषद घ्यायचे ठरवले. त्यासाठी भीमरावांना आमंत्रण पाठवले. ते कळताच रमाई म्हणाली,

''साहेब, तुम्ही खरेच लंडनला जाणार ?''

''जायला हवं, हे पाहा पत्र.''

''मी येऊ ?''

भीमराव हसले आणि मनात दुखावले. कसे नेणार होते ते, रमाला आपल्या बरोबर ? तिची प्रकृती त्याला योग्य नव्हती. लंडनची थंडी तिला सहन होणे शक्यच नव्हते.

ते जेव्हा लंडनला गेले तेव्हा त्यांना निरोप दयायला रमाई बंदरावर गेल्या होत्या. त्यांवेळी धारवाडच्या आश्रमाचे मुख्य बळवंत वराळेही आले होते. भीमरावांनी धारवाडला सुरू केलेल्या आश्रमाची ते व्यवस्था पाहात होते. भीमरावांनी सांगितल्याप्रमाणे ते रमाबाई, यशवंत आणि लक्ष्मीबाईनां हवापालटासाठी धारवाडला घेऊन गेले.

रमाबाई आश्रमातल्या मुलांशी अत्यंत प्रेमाने वागत. त्यांच्या रूपाने मुलांना आई मिळाली. एक्दा वसतिगृहातल्या स्वयंपाकघरात अगदी सामसूम दिसत होती. त्याबद्दल रमाईना वराळेंना विचारले,

''बळवंत भाऊ, आज आगदी सामसूम दिसते.''काय सांगू, गेल्या सहा महिन्यात वसतिगृहाला शासनाच अनुदान मिळालं नाही. कर्ज काढून वेळ निभावून नेली. पण आता कुणी कर्जही देत नाही. इमारतीचं भाडं थकलंय दुकानदार सामान देत नाही. आता काय करावं तेच सुचत नाही.''

''भाऊ, काळजी करू नका. या माझ्या बांगड्या विका आणि मुलांच्या जेवणाची व्यवस्था करा.''

रमाईनी हातातल्या बांगड्या बळवंतरावांच्या हातात ठेवल्यां. बळवंतराव आपल्या डोळ्यांमधले अश्रू आवरू शकले नाहीत.

## शब्दार्थ

**चबुतरा** एका विशिष्ट प्रकारचा ओटा
**बिऱ्हाड** मुक्कामाचे ठिकाण
**अकाली** अवेळी,वेळ नसताना
**प्रौढत्व** मोठेपण
**पारायण** सतत वाचन, पुनःपुन्हा वाचन
**शब्दन्‌शब्द** प्रत्येक शब्द
**महत्त्वाकांक्षा** मोठी इच्छा
**ऋण** देण
**सव्याज** व्याजासकट
**सहकार्य** मदत
**आमंत्रण** बोलवणे
**हवापालट** प्रकृती चांगली होण्यासाठी हवेत, जागेतबदल करणे

## वाक्प्रचार

**नाव उज्ज्वल करणे** नावाला प्रतिष्ठा मिळेल असे कार्य करणे.
**रवाना होणे** जाणे
**पाठीशी राहणे** मदत करणे
**सामसूम दिसणे** वातावरण शांत, गप्प असणे
**वेळ निभावून नेणे** अडचणीतून मार्ग काढणे.

# ४. होय मी सुद्धा

राजीव तांबे



'मोऽऽऽहन' अशी आईची हाक एकताच, मोहन समजला, 'आईचं काहीतरी काम आहे.' आई कुठल्यावेळी कशी हाक मारते, हे मोहनला ठाऊक होत.

कपाळावर आठ्या घालतच मोहन घरी आला.

मोहनला खेळायला, सायकल चालवायला आणि टी. व्ही. पाहायला फार आवडत असे. घरातलं काम करण्याचा त्याला कंटाळा.

मोहनला पाहाताच, आई. म्हणाली, 'अरे राजा, एक छोटंसं काम करशील का रे ?'

मोहनने चेहरा कसनुसा केला.

''अरे, जरा मला वाण्याकडून डाळ, तांदूळ आणि साखर आणून दे ना रे पटकन्.''

आता परीक्षा संपली संपली असल्याने, 'मी अभ्यासाला बसणार आहे.' असली काही सबब मोहनजवळ नव्हती.

मोहनने पिशवी घेतली, आईकडून पैसे घेतले.

रिकामी पिशवी हातात गराग फिरवत आणि जिने धडाधड उतरत मोहन पळाला.

सकाळी दहाची वेळ होती. दुकानात गर्दी होती. मोहनला घाई होती. मोहनचे मित्र त्याची वाट पाहात होते. त्यांचा खेळायचा वेळ फुकट जात होता.

मोहनने थोडा विचार केला. सरळ गर्दीत घुसला. जरा आरडा-ओरडा करून, हातवारे करून त्याने वाण्याचे

लक्ष वेधले, बाकीच्या लोकांनी कुरकुर केली पण त्याने दुर्लक्ष केले.

साखर, डाळ आणि तांदूळ घेतले, वाण्याला पैसे दिले. वाण्याने परत दिलेले पैसे त्याने खिशात कोंबले. धावतच मोहनने घर गाठले.

मोहनने घरात पिशव्या ठेवल्या. आईला पैशाचा हिशेब देण्यासाठी, मोहनने आकडेमोड केली. कागदावर हिशेब मांडला. खिशातले पैसे काढून भराभरा मोजू लागला.

आणि.

मोहन चमकला !

क्षणभर थबकला !

त्याला काय करावे कळेना

वाण्याने चुकून पन्नास रुपये जास्त दिले होते !

मोहन सावरला.

त्याने हळूच पाहिलं. आईचं लक्ष नव्हतं. आई कामात होती. मोहनने थरथरत्या हाताने ती पन्नासची नोट पॅन्टच्या खिशात ठेवली !

त्याने आईला हिशेब दिला. उरलेले पैसे मोजून दिले. आई काही म्हणणार तोच. आईची नजर चुकवत मोहन म्हणाला, "आई मी खेळायला जातो."

मोहनचे मित्र वाटच पाहात होते. सगळेजण पत्ते खेळू लागले. मोहनच्या पत्ते खेळताना वारंवार चुका होत होत्या. त्याच्या चुकांमुळे पत्त्यांचा डाव रंगेना. सगळे जण वैतागले.

मोहनचा मित्र संजय म्हणाला, "अरे यार, काय झालं काय ? असं काय करतोयस ? सारखा का चुकतोयस ? आता आई काही बोलली का तुला ? बोल यार, असा गप्प बसू नकोस."

हातातले पत्ते टाकत मोहन म्हणाला, काय ऊन तापलंय बाहेर. माझं तर जाम डोकं दुखतंय. मी खेळत नाही रे. मी. नुसता बसतो.

मोहन उठला. संजयच्या बाजूला बसला.

मोहन विचार करू लागला.

'काय करावं ह्या पन्नास रूपायांच ?'

समजा आता आपण जाऊन परत केले, तर वाणी म्हणेल, "वा रे शंभ्या ! एवढा वेळ काय झोपला होतास वाटतं ?"

आणि आईला सांगतिलं तर आई म्हणेल, हिशेबाच्या वेळीच तर तुला कळलं होतं ना ? मग तेव्हाच का नाही बोललास ? थांब आता बाबा बँकेतून आले की, त्यांनाच तुझं नाव सांगते."

मग मोहनने असा विचार केला की, 'हे पैसे, आपण काही चोरलेले नाहीत. मग काम  हरकत आहे, हे पैसे आपल्याजवळ ठेवायला ? चोरी करणं वाईट आहे. पण मी काही चोर नाही. हो किनई ?'

आणि मोहनने आपल्या **प्रश्ना**लां मनातल्या मनात उत्तर दिलं, 'हो ! हो ! मी चोर नाही ! हे पन्नास रूपये माझे आहेत ! माझेच आहेत !!'

मोहन अर्धवट डोळे बंद करून, आपल्या खिशावरून हात फिरवत, **प्रश्ना**चं उत्तर घोकत होता, पुटपुटत होता.

पत्त्याचा डाव संपला होता.

मोहनकडे पाहात प्रकाश म्हणाला, "काय रे । वेड बीड लागलं की काय ? ऑ ? काय बडबडतोयस काय ?"

पण मोहन आपल्या तंद्रीत होता.

डाव संपल्यावर संजय निघून गेला. आता पत्ते खेळायला एक भिडू कमी पडत होता.

"एऽमोहन, असा काय, चोरासारखा बाजूला बसलायस ? चल खेळायला." असं अनिलने म्हणताच मोहन उसळला. त्याने अनिलची कॉलर धरली. मोहन रागाने दात ओठ खातऽम्हणाला, "ए भोपळ्या, मी चोर नाहीए मी नाही चोरी केली. मला जर पुहा चोर म्हणालास ना तर तुला एकच..."

मोहन संतापाने थरथरत होता. त्याला पुढे बोलता येईना. त्याने अनिलला मारण्यासाठी हात उगारला. अनिल जाम भ्यायला. त्याला कळेचना, मध्येच हे काय झालं ? जराशी गंमत केली तर इतकं चिडायचं कारण काय ?

बाकीच्या मित्रांनी मोहनला सावरलं. अनिलला सोडवलं. अनिल धूम पळाला पत्त्याचा खेळ थांबला. बाकी सगळे गेले. मोहन एकटाच राहिला. रमतगमत मोहन घराकडे वळला. हळूच त्याने एकदा खिशावरून हात फिरवला, अगदी हळुवारपणे.

आई मोहनची वाटच पाहात होती.

"चल हातपाय धुऊन घे, जेवायला बसू या."

मोहनने वरण भात कालवला. एक घास घेतला आणि म्हणाली, "अरे तू सकाळी आणलेल्या तांदळाचां हा भात आहे ! काय कसा आहे तांदूळ ?"

मोहन अस्वस्थ झाला त्याला घास गिळता येईना. घास तोंडात फिरू लागला. त्याच्या पोटात खड्डा पडला. त्याने बळे बळे घास गिळला, वर घटाघटा पाणी प्यायला.

"सकाळी गर्दी होती का रे वाण्याकडे ?" असं आईने म्हणताच मोहन कावराबावरा झाला, त्याने आईची नजर चुकवली. तो पानातला भात चिवडू लागला.

'अरे मघाशी वाण्याचा माणूस येऊन गेला घरी.' तो म्हणाला... त्याला आईचं पुढचं बोलणं ऐकूच आलं नाही. त्याचे भीतीने पाय लटलटू लागले. पोटात बाकबूक होऊ लागलं. त्याला 'ती खिशातली नोट टोचू लागली.'

त्याला वाटलं, 'तो वाण्याचा माणूस घरी येऊन आईला म्हणाला असेल, "वहिनी, तुमचा मुलगा चोर आहे चोर !! त्याने पन्नास रूपये चोरलेत !!"

बापरे माझ्यामुळे आईचा अपमान झाला.त्याला एकदम गरगरू लागलं. त्याला सगळी खोली क्षणभर गोल फिरल्यासारखी वाटली.

मोहन एकदम ओरडला, "नाही ! नाही ! मी नाही !!!"

समजुतीच्या सुरात आई म्हणाली, "अरे असं ओरडायला काय झालं ? मी तुला काही बोलले का ? चुकी तुझी नाही, त्याचीच आहे म्हणून तर तो नंतर धावत आला, मला समजलं सारं !!!"

"अरे तू जेव ना. असं काय करतोयस ?"

तो भर दुपारी रस्त्यावरून अनवाणी धावत होता.

तो वाण्याच्या दुकानात गेला. वाणी एकटाच हिशेब करत बसला होता.

मोहनने वाण्याला ती पन्नास रूपयाची नोट परत केली. म्हणाला, "वाणीदादा, सॉरी ! माझी चूक झाली !"

"सकाळी मला तुमच्याकडून जास्ती पैसे मिळाले. मला यायला उशीर झाला."

वाणीदादा हसला. त्याने मोहनला शाबासकी दिली. समोरच्या बरणीतलं एक चॉक्लेट काढून त्याने मोहनसमोर धरलं.

मोहनने हात जोडून पुन्हा एकदा 'सॉरी म्हटलं आणि...'

चॉकलेट न घेताच त्याने घराकडे धूम ठोकली.

धापा टाकतच मोहन घरात शिरला. त्याला नीट बोलताही येईना. त्याला खूप भरून आलं होतं.

त्याने आईचा हात हातात घेतला आणि म्हणाला. "होय, मी सुद्धा स्वाभिमानी आणि प्रामाणिक आहे तुझ्यासारखा होय मी सुद्धां !!!"

## शब्दार्थ

**अस्वस्थ** बेचेन

**कावराबावरा** घाबरागुबरा

**बाक बूक** कसे तरी

## वाक्प्रचार

**पाय लटपटणे** खूप भीती वाटणे

**धूम ठोकणे** पळून जाणे

**धापा टाकणे** खूप जलद गतीने काम केल्याने दम लागणे

**भरून येणे** मनात भावना दाटणे